साप्ताहिक

शनिवार
१४ नोव्हेंबर १९८१

# माणूस

किंमत
एक रुपया

# इंदिरा गांधींचे वाढते परदेशदौरे

खलिस्तानपासून केरळपर्यंत आणि अंतुले प्रतिष्ठान ते बिहारातील भ्रष्टाचारापर्यंत अनेक प्रश्नांचे भुंगे देश पोखरत असता इंदिरा गांधी अलीकडे, तेही वरचेवर, परदेशदौऱ्यावर का जात आहेत ?

हे दौरेही लहानसहान नसतात. सतत दहा–दहा, बारा–बारा दिवस त्या परदेशात असतात. इतर मंत्र्यांनी परदेश–दौरे कमी करावेत असे सांगून, त्यांनी मात्र बारीकसारीक देशांनाही भेटी देण्याचा सपाटाच लावलेला आहे, तो का असावा ?

दिल्लीतल्या इंदिरा निरीक्षक पत्रकारांनाही (Indira Watchers) हे एक कोडेच वाटते. काहींचे म्हणणे असे की, दिल्लीत असल्या, की इतक्या कटकटी, इतके प्रश्न त्यांचा वेळ खात असतात, की पुरेसे स्वास्थ्य, पुरेशी विश्रांती त्यांना लाभू शकत नाही. आपल्या कुटुंबियांसमवेत पुरेसा वेळ त्या घालवू शकत नाहीत. अलीकडच्या सर्व परदेशदौऱ्यात कुटुंबियांपैकी कोणी न् कोणी तरी त्यांच्यावरोबर असतेच. जो निवांतपणा, जो कौटुंबिक आनंद दिल्लीत असताना, राजकारणाच्या धबडग्यामुळे त्यांना लाभू शकत नाही त्याची भरपाई परदेशदौऱ्यात करता येते. या पत्रकारांच्या मते इंदिरा गांधींच्या वाढत्या परदेशदौऱ्यामागचे हे एक इंगित आहे.

डोंगर पोखरून काही पत्रकार उंदीर काढून दाखवतात, तो असा.

घर आणि राजकारण यांची गल्लत न करण्याची दक्षता नेहरू घराणे नेहमीच बाळगीत आलेले आहे. तेव्हा विश्रांतीचा ठराविक काळ इंदिरा गांधी दिल्लीत राहूनही केव्हाही वेगळा काढू शकतात, काढत असतीलच. त्यासाठी त्यांना परदेशी धावाधाव करण्याची मुळीच गरज नाही.

या दीर्घ मुदतीच्या व वारंवार चालू असलेल्या परदेशदौऱ्यांचा असाही एक अर्थ आहे की, आपल्यासारख्या सर्वसामान्यांना व विरोधी पक्षांना खलिस्तान, आसाम, केरळ, अंतुले–भ्रष्टाचार इत्यादी प्रश्न कितीही गंभीर व चिंताजनक वाटत असले तरी इंदिरा गांधींना ते तसे फारसे वाटत नसावेत. आपण आठ–पंधरा दिवस दिल्लीबाहेर राहिलो तरी प्रश्न आहेत तिथेच राहतील, परिस्थितीवरची आपली पकड जराही ढिली होणार नाही, याची त्यांना पूर्ण खात्री वाटत असावी. नाही तर इतक्या निर्धास्तपणे त्या जगभर हिंडत राहिल्याच नसत्या !

वाढत्या परदेशदौऱ्यांचे मुख्य कारण इंदिरा गांधींची वाढती महत्त्वाकांक्षा हे आहे. भारतापुरते इंदिरा गांधींचे स्थान इतिहासात पक्के कोरले गेलेले आहे. त्या सत्तेवर असोत किंवा नसोत, नेहरूंनंतरचा कालखंड त्यांच्याच नावे नोंदला जाईल, यात काही शंका उरलेली नाही. या कालखंडावरचा त्यांचा ठसा कोणालाही पुसता येणार नाही, एवढा तो प्रभावी आहे. उरल्यासुरल्या पाकिस्तानला त्यांनी आणखी एकदा धूळ चारली व त्याचे आणखी तुकडे केले तर हा प्रभाव आणखीनच वाढेल, त्यांचे इतिहासातील स्थान अधिकच पक्के होईल, हेही उघडच आहे.

पण एवढ्यावरच संतुष्ट असायला त्या कुणी सर्वसामान्य राजकीय कार्यकर्त्या थोड्याच आहेत ? आता त्यांचे लक्ष आहे आंतरराष्ट्रीय क्षितिजांकडे. तिसऱ्या जगताचे नेतृत्व त्या आपल्याकडे खेचून आणू पाहत आहेत. हे नेतृत्व स्वतःकडे घेऊन, जगातील पहिल्याश्रेणीतले राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून विराजमान होण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. असंतुष्ट ब्राह्मण आणि संतुष्ट महीपती म्हणजे सत्ताधारी नष्ट होतात, असे एक संस्कृत सुभाषित आहे. इंदिरा गांधी हे एक सत्ताप्रधान व्यक्तिमत्व असल्याने त्या संतुष्ट व निवृत्तचित्त कशा राहू शकतील ?

प्रबळ राजकीय इच्छाशक्ती व सत्ताकांक्षा असलेल्या व्यक्ती शेवटपर्यंत नवीनवी क्षितिजे पादाक्रान्त करीत राहतात, तशा प्रयत्नात असतात. इंदिरा गांधीसुद्धा याला अपवाद कशा ठरतील ?

अशी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती व प्रभुत्वाची आकांक्षा असलेला विरोधी पक्ष किंवा पक्षनेता आज तरी दृष्टीसमोर येत नाही. असा पक्ष किंवा पक्षनेताच इंदिरा गांधींना समर्थ पर्याय ठरू शकेल. स्थापनेपासून वर्षा – दोन वर्षांतच फुटणारा पक्ष किंवा काही महिन्यातच मोडणाऱ्या आघाड्या बनवून काय उपयोग ?

–श्री. ग. मा.

मुंबई वार्ता

# परिसंवाद नामक करमणुकीचा कार्यक्रम

काही दिवसांपूर्वी ठाण्याच्या गडकरी रंगायतन आणि मेंटल हॉस्पिटलमध्ये, इंडियन सायकिअ‍ॅट्रिक सोसायटीचं वार्षिक अधिवेशन भरलं होतं. अशा निरनिराळ्या वैद्यकीय शाखांची अधिवेशनं हे वैज्ञानिक मेळावेच असतात. व्यवसायबधूच्या भेटीगाठी, याबरोबरच आपल्या व्यवसायातल्या नवीन ज्ञानाची, शोधाची आणि अनुभवांची देवाणघेवाण असं या स्वरूपाच्या अधिवेशनाचं दुहेरी स्वरूप असतं. या उद्देशानं आयोजित केलेले परिसंवाद,चर्चा किंवा निबधवाचन या साऱ्यांतून अशा कार्यक्रमाचं गांभीर्य आणि त्यांची अभ्यासूबैठक या साऱ्याची छाप जाणवत रहाते

ठाण्याच्या सायकिअ‍ॅट्रिस्टस कॉन्फरन्समध्ये जे कार्यक्रम झाले, त्यात दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमात एका परिसंवादाचा समावेश होता. 'जनसंपर्क माध्यमाचा मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम' हा या परिसंवादाचा विषय. परिसवादात भाग घेणारी मंडळीही मातब्बर आणि विषय तर खरोखरच लाख मोलाचा! समाजाची ढासळत चाललेली मूल्यव्यवस्था, अशा समाजाच्या मनोरंजनासाठी जनसपर्क माध्यमानी प्रसृत केलेले हीन अभिरुचिचे कार्यक्रम आणि परिणामी अधिकच ढासळणारी नीतिमत्ता ही विशेषत: शहरी समाजाला अगदी ग्रासून टाकणारी चिंता आहे. हे सारं एक दुष्टचक्रच होऊन बसलं आहे. मागणी तसा पुरवठा, हे खरं की पुरवठा तशी मागणी हे खरं ? आणि दोन्ही खरं असेल, तर यातून बाहेर पडण्याचा मार्ग कुठला आणि कसा ? मानसिक आरोग्य ढासळणं म्हणजे नेमकं काय ? हे सगळं केवळ मूठभर कलाकार किंवा मानसशास्त्रज्ञ एवढ्याच्याच विचारांचा विषय नाही, आम जनतेलाही त्यात तेवढाच रस आहे. बहुधा म्हणूनच हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला ठेवण्यात आला असावा. या प्रश्नावर अगदी ठाम उत्तर जरी नाही तरी काही उद्बोधक विचार ऐकायला मिळतील म्हणून सारं सभागृहही नाटकाभरल्या गर्दीनं 'हाउसफुल्ल' झाल होतं !

एका बाजूला डॉ. शर्मा, डॉ. शास्त्री, डॉ. वाटवे आणि डॉ. मोहन आगाशे हे मानसोपचारतज्ज्ञ. दुसऱ्या बाजूला प्रश्नकर्त्या जनतेचे प्रतिनिधी म्हणून सात–आठजण आणि मधोमध नरेन्द्र बल्लाळ, विजय परुळेकर, ओम पुरी (जे परिसंवादाच्या सुरुवातीलाच उठून गेले), 'सप्रेम नमस्कार' फेम विश्वास मेहेंदळे आणि तनुजा हे संपर्कमाध्यमांचे प्रतिनिधी अशी एकूण मांडणी. चर्चेचं सचलन करणारे डॉ. आनंद नाडकर्णी एका बाजूला बसलेले. चर्चेची सुरुवात झाली ती अगदी खेळकर वातावरणात. मुळात रविवारची सकाळ हीच एक खास विलोभनीय गोष्ट असते. त्यातही 'क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे,' या साऱ्यानं अधिकच वाढलेली रविवारची मजा, 'गडकरी रंगायतन'चा आकर्षक परिसर या साऱ्यानं वातावरण अगदी प्रसन्न वाटत होतं. अशा वातावरणात हास्य-विनोदाच्या फवाऱ्यांनी कार्यक्रमाला सुरुवात झाली, तेव्हा एक लक्षणीय आणि स्मरणीय कार्यक्रम ऐकायला मिळेल अशा अपेक्षा साहजिकच उंचावू लागल्या. नाही तरी हास्य-विनोदाचं विचारांना वावडं थोडंच आहे ? पण कार्यक्रमात शेवटपर्यंत फक्त अशा फुलबाज्याच झडत राहिल्या. त्यातून कुणाच्या डोक्यात काही प्रकाश पडला नाही ही गोष्ट निराळीच...

सुरवातीला मानसिक आरोग्याविषयी डॉ. आगाश्यानी थोडं विवेचन केलं. शक्तिवर्धकं, औषधं घेऊन शरीराची ताकद वाढवता येते तशी मनाचीही क्षमता वाढवता येते आणि संपर्कमाध्यमानी तशी क्षमता वाढवली पाहिजे; पण याच संदर्भात 'नॉर्मलिटी'ची व्याख्या करणं मात्र शेवटपर्यंत राहूनच गेलं. यानंतर विजय परुळकरांनी म्हटलं की, आपल्याकडच्या सपर्कमाध्यमांची व्याप्ती अतिशय मर्यादित आहे. आकाशवाणी निदान १८।२० टक्के लोकसंख्येपर्यंत तरी पोचली आहे; पण दूरचित्रवाणी जेमतेम दीड ते दोन टक्क्यांपर्यंत पोचली आहे. म्हणजे देशाच्या एकूण लोकसंख्येचा विचार केला, तर त्यांची भूमिका अक्षरश: नगण्य म्हणावी लागेल; पण असं जरी असलं, तरी ज्या माणसापर्यंत ही माध्यमं पोचतात, त्यांच्यावर त्याचा जबरदस्त परिणाम होतो आणि म्हणून या माध्यमांचा विचार करायला हवाच.

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सत्ताविसावा

१४ नोव्हेंबर १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३० दूरध्वनी : ४४३४५९

सुरवात झाली ती वर्तमानपत्रांपासून. वर्तमानपत्रं समाजाचं आरोग्य कितपत घडवू–बिघडवू शकतात ? 'मानसिक आरोग्याचा अर्थ केवळ मनोविकृतीपासून दूर ठेवणं इतपतच मर्यादित करायचा म्हटला, तर वर्तमानपत्रं फार काही करू शकतील असं नाही; पण वृत्तपत्रं आणि त्याचे संपादक समाजाची एखादी मनोभूमिका तयार करू शकतात, विचार आणि प्रेरणा देऊ शकतात आणि तोही मानसिक क्षमता वाढवावयाचाच एक भाग म्हटला पाहिजे. जसं स्वातंत्र्यपूर्व काळात टिळक–आगरकरांनी आपल्या लेखणीद्वारा माणसं घडवली. तेव्हा लोकांना मार्गदर्शक ठरेल असं पत्रकाराचं व्यक्तित्व आणि लेखन असलं पाहिजे.'—हा प्रश्न झाला की हे उत्तर ?—दोन्हीही ! 'वर्तमानपत्रांचा आणि समाजाच्या मानसिक आरोग्याचा काय संबंध असतो ?' हा प्रश्न तनुजाबाईंनी मोठ्या चातुर्यानं प्रश्नकर्तीवरच उलटवला—'तुमची काय अपेक्षा आहे वर्तमानपत्राकडून ?' आणि प्रश्नकर्तीनं जे उत्तर दिलं, त्याच्याशी नरेंद्र बल्लाळ सहमत झाले !

वर्तमानपत्रांवर खरे तुटून पडले ते डॉ. वाटवे. त्याचं म्हणण की, वृत्तपत्रं अशीच राहिली, तर मानसिक स्वास्थ्य सुधारण्याची सुतराम् शक्यता नाही. भडक, सनसनाटी बातम्या देण आणि खप वाढवणं हेच ज्याचं धोरण आहे, त्या वृत्तपत्राना मानसिक आरोग्याची मुळी पर्वाच काय ? लोकाचं कुतुहल जागं व्हावं, म्हणून नको त्या गोष्टींना प्रसिद्धी दिली जाते. इथे कुत्रा माणसाला चावला तर ती बातमी असते; माणूस कुत्र्याला चावतं ही बातमी नसते. जोशी–अभ्यंकर खून खटल्यातल्या आरोपीच्या वागण्या–बोलण्याचे, पेहेरावाचे आणि दिनचर्येचे लबे–चौडे तपशील वृत्तपत्रानी दिले. त्यानं काय समाजाच्या स्वास्थ्यात भर पडणार होती ? वृत्तपत्रांनी तर ही काळजी अधिकच घ्यायला हवी. त्याच्या कपाळावर काही 'ए' आणि 'यू' अशा प्रमाणपत्रांचे छाप नसतात. ती सरसकट सर्वांच्या हातात पडतात. एका वर्तमानपत्रानं सध्या सेक्स एज्युकेशनसबधी लेखमाला सुरू केली आहे. असे उपक्रम अधिकाधिक व्हायला पाहिजेत. समाजाचे गैरसमज आणि अज्ञान समाजातनं दूर करायला पाहिजे. दुर्दैवानं तसे प्रयत्न मात्र फार थोडे दिसतात.

हा आरोप खरं म्हणजे केवळ वृत्तपत्रांवरचा; पण विश्वास मेहेंदळयानी दूरदर्शनसंबंधीची आपली सफाई द्यायलाही इथेच सुरुवात केली. खरं म्हणजे ती सफाई नव्हतीच. कारण मेहेंदळयांच्या मते त्याबद्दल स्पष्टीकरण द्यावं अशी काहीही चूक दूरदर्शनच्या कार्यक्रमांच्या निवडीत नसते. सिनेमामध्ये बातम्यांच्या मध्यंतरात कुकर लावणं, आलेल्या पाहुण्याशी बोलणं यासारखी कर्तव्यं उरकून सिनेमा सुरू झाल्यावर माणसं टी. व्ही. वर डोळे खिळवून असतात. छायागीतावर जीव टाकतात. यात दूरदर्शनची काय बरं चूक ? 'अरे आम्ही काहीही 'बुल्शीट' दाखवू; टी. व्ही. चं स्विच ऑफ करणं तर तुमच्याच हाती आहे शेवटी !'

ऐकणाऱ्याला हतबुद्ध करून सोडणाऱ्या या युक्तिवादावर विजय परुळकरांनी टोला लगावला—हे म्हणजे एखाद्या कारखानदारानं म्हणण्यासारखं आहे की, हे पहा आमच्या या कारखान्यातून अपायकारक पॉइझन्स, गॅस हा निघणारच. तुम्ही स्वतःच्या नाकावर मास्क चढवून बसा हवं तर !— यावर प्रत्युत्तरादाखल मेहेंदळयांनी संत कबिरांकडून कुमक मागवली आणि एक दोहा फेकीत म्हटलं की, आम्ही निदान काही तरी करतो आहोत. (ते 'काही तरीच' असलं म्हणून काय झाल ?) नुसते बसून नाही आणि हेही कौतुकास्पदच आहे.

सुविचार, सुवचनं वगैरेचं एक बरं असतं. तुम्हाला हव्या त्या काठ-पदराची आणि पोत–डिझाइनची सुवचनं कायम उपलब्ध असतात आणि त्याची प्रभावळ तर एवढी झगमगती असते की,त्यात त्यांचं संदर्भहीन असणं–नसणंही दिसेनासं होतं ! पण खेळीमेळीच्या वातावरणात चाललेल्या या सवाल–जबाबातून परिसंवादाचा नूर पहिल्या काही मिनिटांतच स्पष्ट झाला आणि तो असा की, संपर्कमाध्यमांमुळे समाजाच्या मानसिक स्वास्थ्यावर जर काही परिणाम होत असेल, तर त्याची जबाबदारी घ्यायला मिडियावाले तयार नाहीत किंवा मानसिक स्वास्थ्य टिकवणारे कार्यक्रम द्यावेत, अशा कुठल्याही सामाजिक बांधिलकीलाही त्यांची तयारी नाही. लोकांना स्वातंत्र्य आहे. तेव्हा त्यांच्या बऱ्या-वाइटाची जबाबदारीही त्याचीच आहे. त्यांची काळजी त्यानीच घ्यायला हवी असा धक्कादायक सूर अगदी भेदकपणे प्रकट झाला.

यानंतर पुस्तकांचा विचार-पोनाग्राफिक लिटरेचर किंवा गॉसिप मॅगझिन्स वाचणाऱ्यावर खरोखर काही दुष्परिणाम होतात का ? 'प्लेबॉय'मध्ये काढलेला एक निष्कर्ष डॉ. नाडकर्ण्यांनी सांगितला की, अशा वाङ्मयाचा वाचणाऱ्यावर काहीही परिणाम होत नाही. हे कितपत खरं आहे ? विश्वास मेहेंदळे याच्याशी एकदम सहमत. समाजाची नीतिमत्ता ढासळत असली तर ती समाज-परिस्थितीमुळेच. त्यात प्रसारमाध्यमांचा काही संबध येत नाही. 'अहो, साधं उदाहरण घ्या. काही वर्षांपूर्वी जागाची एवढी चणचण नव्हती आणि त्याचे भावही एवढे भडकलेले नव्हते; पण आज अगदी डोंबिवलीसारख्या ठिकाणीसुद्धा तीस–चाळीस हजार डिपॉझिट भरूनही दोन खोल्या मिळणसुद्धा मुष्किल झालं आहे. अशा परिस्थितीत एखाद्या नवविवाहित जोडप्यानं डोंबिवलीच्या प्लॅटफॉर्मवरच काही केलं, तर त्यात त्याचा काय दोष ? आणि प्रचारमाध्यमाचा तरी काय दोष ?' मेहेंदळयाच्या या वक्तव्यानं नवविवाहिताना हुरूप आला असली, तरी बाकीचे डोंबिवलाकर बिचारे धास्तावलेल्या मनानच सध्या प्लॅटफॉर्मवर उभे असतात !

प्रसार माध्यमाच्या जनमतावर काहीच परिणाम होत नसेल, तर ती नामुष्कीचीच गोष्ट म्हटली पाहिजे, की 'टाइम पास' एवढीच महत्त्वहीन,अर्थहीनकरमणूक त्याच्याकडून मिळते ! दूरदर्शनच्या चांगल्या कार्यक्रमानी कुणी प्रभावित झालं,तर ते श्रेय दूरदर्शनच; पण कुणी हीन अभिरूचिचे कार्यक्रम पाहून बिघडल, तर त्याची जबाबदारी त्या व्यक्तीची किंवा सामाजिक परिस्थितीची हा भाग म्हणजे शुद्ध पलायनवाद झाला. प्रसारमाध्यमं किती प्रभावी आहेत हे सागताना परुळकरांनी एक चांगली प्रतिमा वापरली. ते म्हणाले, मिडिया एखाद्या हायवेसारखा आहे. व्यक्ती–व्यक्तीपर्यंत पोचणारा तो अधिकृत राजरस्ता आहे. तेव्हा या हायवेवरून आपली वाहनं किती वगानं जाऊ

पृष्ठ २३ वर

# आला मलेरियांचा दौरा

## वेळेवरच उपचार करा त्याच्या मुळावरच घाव घाला

मलेरिया सर्वत्र थैमान घालण्याचे संकट आमच्यासमोर आहे. या भयंकर रोगावर परिणामकारक नियंत्रण करण्यात आले पाहिजे. मलेरियावर उपाय आहे. पण त्यावर परिणामकारक नियंत्रण हाच खरा मार्ग. त्यासाठीं कांही उपयुक्त सूचना :-

**कारणें**

- एका परपुष्ट सुक्ष्म जंतुमुळे मलेरिया होतो.
- डांस, असे परपुष्ट जंतु, मलेरियाच्या रोग्यापासून उचलतात आणि निरोगी माणसांना चावून त्यांच्या शरीरात सोडतात.
- जेथें पाणी सांठते तेथे डांसांची पैदास होते.
- रोग्याला तावडतोब उपचार न केल्यास हा रोग पसरण्याचा खोका असतो.

**लक्षणें**

१. अचानक हुडहुडी भरुन ताप येतो.
२. उष्णतेचे चटके लागतात आणि डोके दुखते.
३. नंतर, ताप उतरतो, खूप घाम येतो आणि अशक्तता येते.

**सावध रहा**

मेंदूचा अथवा घातक मलेरिया झाल्यास त्यामुळें मानसिक यातना होऊन, रोगी बेशुद्ध होऊ शकतो अथवा वातात येऊ शकतो. वेळेवर उपचार न झाल्यास असा मलेरिया प्राणघातक ठरु शकतो.

**उपचार**

- रोग्याचे रक्त तावडतोब तपासून घ्या.
- तात्कालिक उपचार म्हणून क्लोरोक्विनच्या गोळया घ्या.
- मलेरियाचा ताप आहे हे सिद्ध झाल्यास, संपूर्ण पांच दिवस कडक उपचार करा.

मलेरिया कार्यकर्ता अथवा जवळचे प्राथमिक आरोग्य केंद्र, औषधालय अथवा रुग्णालय येथे या. तेथे सर्व उपचार मोफत करण्यात येतील.



**प्रतिबंधक उपाय**

- मोऱ्या, खड्डे, फुलदाण्या, मोडकेतोडके डबे, वगैरे भांड्यातून तसेच घरात अथवा घराभोवतीं, पावसाळी अथवा घाणपाणी साठूं देऊ नका.
- सर्व पाण्याच्या टाक्यां, टब, भांडी वगैरे आठवड्यातून एकदां निकामी करा.
- आपल्या गावात अथवा वस्तीत येणाऱ्या जंतुनाशक फवारणी पथकाबरोबर सहकार्य करा.
- आपल्या घरातील कोनाकोपऱ्यातहि नीट फवारणी करुन घ्या. कोठार, स्वयपाकघर, देवघर अथवा गोठा यांना वगळू नका. फवारणी चालू असतांना खाद्यपदार्थ आणि चारावैरण झाकून ठेवा.
- फवारणी झाल्यावरांबर मातीचे लिंपण अथवा सफेदी करण्याचे टाळा.

**ताप आलेल्या प्रत्येक रोग्याची आरोग्य रक्षकास माहिती द्या**

**राष्ट्रीय मलेरिया निर्मुलन कार्यक्रम**
(आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय)
२२, शामनाथ मार्ग, दिल्ली-११००५४

davp 81/188

# उत्तरमीमांसा : २६

स. शि. भावे

# अ. भि. शहा यांची वैचारिक व्रतसाधना ....आणि विचारवंतांची अलिप्तता

३ ऑक्टोबरच्या अंकापासून साप्ताहिक 'माणूस'ने दिवाळीसाठी सुटी घेतली. या १४ नवंबरच्या अंकापासून ही सुटी संपत आहे.

सहा आठवड्याच्या या काळात बऱ्याच महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. मुंबईस पोलिसांचा संप झाला, खलिस्तानच्या समर्थकांनी विमान पळविले, पंजाब पेटवला आणि दिल्लीला हादरा दिला...राष्ट्राध्यक्षांनी अधिक स्वायत्ततेचा पुरस्कार नुकताच केला. दक्षिण आफ्रिकेच्या वर्णभेदाच्या धोरणाकडे काणाडोळा करणाऱ्याकडे शासनाने काणाडोळा केला आणि इंग्लंडच्या क्रिकेट–चमूचा दौरा कायम केला.

या साऱ्या घडामोडीची बुद्धिवादी चिकित्सा मात्र पुढे आली नाही. (तुरळक अपवाद अर्थात् वजा करायचे) कालपरवाच नव्हे, तर जवळजवळ दहा–पंधरा वर्षे, विचारवंत गप्प–गप्पच आहेत. कोणी निराश झालेले, तर कोणी थकलेले, तर कोणी परिस्थितीचा वास घेऊन गप्प !

¤

विचारवंतासंबंधी असे बरेच प्रश्न आज मनात येत आहेत, त्याला एक कारण आहे. महाराष्ट्रातले आणि देशातले प्रमुख विचारवंत प्रो. अ. भि. शहा यांच्या अकाली निधनाने विचारवंतांचा गप्पपणा किती तरी पटीनी जाणवतो आहे.

११ ऑक्टोबरला पुण्यास बुद्धिप्रामाण्यवाद्यांचा मेळावा भरला होता त्याच दिवशी अ. भि. शहांनी इहलोक सोडला ! इहवादी विचारधारेच्या महान प्रवक्त्याने इहलोक सोडला. बुद्धिप्रामाण्यवादी विचाराला या योगाने काहीच वाटणार नाही. भावनेला मात्र या योगायोगाची विचित्र जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही.

अ. भि. शहाचे जीवित आणि कार्य असे अकस्मात् थांबल्यामुळे विचारांच्या आणि विचारवाद्याच्या कार्याचे फार मोठे नुकसान झाले आहे. डॉ. वि. रा. करंदीकरांनी 'तरुण भारत' मधील श्रद्धांजलीत म्हटल्याप्रमाणे, शहाच्या निधनाने आपल्या समाजाची किती हानी झाली आहे हे लक्षातही न येणे ही शहांच्या निधनाच्या तोडीस तोड किंवा जास्त भयानक, शोककारक अवस्था आहे !

विचारवंताचे जग शहाच्या निधनाने अधिक गप्प झाल्यासारखे वाटते आहे. कारण शहा हे क्रियाशील विचारवंत होते आणि समाजात जसे खरे विचारवंत थोडे, तसे विचारवंतांत खरे क्रियाशील विचारवंत थोडे असतात !

असे म्हणताना एका आक्षेपाचा विचार केला पाहिजे. आक्षेप असा येईल की, विचार करणे आणि विचार प्रकट करणे, हीच क्रिया नव्हे काय ? आणि असे निष्ठेने सतत करीत राहणे ही क्रियाशीलता नव्हे काय ?

यास उत्तर असे की, होय, विचार करीत राहणे ही क्रियाशीलताच आहे. तथापि ती पुरेशी क्रियाशीलता नव्हे. सामाजिक आणि व्यावहारिक आचरणात वैचारिकतेचे तत्त्व उतरले म्हणजे ही क्रियाशीलता पुरी क्रियाशीलता होईल. अन्यथा पहिली क्रियाशीलता ही, 'आमचे शस्त्र म्हणजे विचार' असे म्हणणारी, आरामखुर्चीत पहुडून विचारकोशात रमणारी, फाल्गुनरावी क्रियाशीलता होईल !

विचारवंताकडे कमी लक्ष दिले जाते किंवा लक्ष दिले जात नाही, अशी तक्रार आज केली जात आहे. या अवस्थेला आजकालचे विचारवंत हेच प्रामुख्याने कारण आहेत. आजचे बहुतेक विचारवंत, त्या ऐतिहासिक 'अर्ध्या' शहाण्याप्रमाणे, 'अर्धे' विचारवंत झाले आहेत. वैचारिक आचरणाचा उरलेला अर्धा भाग नसल्याने त्यांच्या विचाराला तेज प्राप्त होत नाही. त्यांच्या विचाराचा प्रभाव सामान्य जनतेवर पडू शकत नाही. कारण 'या विचाराच्या आचरणाने असे असे होते व असे असे समाधान होते'–असे उदाहरणच लोकांपुढे उभे राहात नाही.

¤

अ. भि. शहा यानी स्वतःच्या विचारांनी आणि वैचारिक आचरणाने असे उदाहरण घालून दिले हे त्याचे खरे मोठेपण होय.

वैचरिकतेने प्रेरित झालेले त्याचे आचरण, जवळून–दुरून असा, मी गेली तीस - बत्तीस वर्षे पाहत आहे, प्रा. ग. प्र. प्रधान हे माझे तेव्हाचे 'सर' आणि आताचे स्नेही. त्यांनी प्रथम मला शहाकडे नेले होते. माडीवाले कॉलनीत, वरच्या मजल्यावरच्या एका ब्लॉकमध्ये शहा तेव्हा राहत असत. उत्साही, अगत्यशील, बुद्धिमान, भेदक अशी माझी त्यांची पहिली आठवण आहे.

पुणे विद्यापीठ शिक्षक संघटनेचे प्रमुख कार्यवाह या नात्याने त्यानी केलेले कार्य हे मी पाहिलेले त्याचे पहिले कार्य. विचारवंत म्हणून त्यांचे पहिले वैफल्य त्याना या कार्यातच अनुभवायला मिळाले असावे. अध्यापकाची संघटना ही केवळ ट्रेड यूनियन नसावी, केवळ पगारसुविधा यांकडेच तिचे लक्ष नसावे. परस्पराची ज्ञानाची, अध्यापनाच्या पात्रतेची पातळी वाढविण्यासाठीही या संघटनेने प्रयत्न करावे, अशी शहांची आदर्श धारणा होती. याच धारणेने शहा व प्रधान यांनी त्या काळी 'पुटा' तर्फे 'इंटिग्रेटेड लेक्चर्स सीरीज' आयोजित केली.. उत्कृष्ट वक्त्यांचे सहकार्य त्यानी मिळवले; पण या व्याख्यानमालेच्या रूपाने मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा लाभ फारच थोडया अध्यापकांनी घेतला. अशी व्याख्यानमाला शहानीही पुढे योजिली नाही, पुटानेही योजिली नाही.

मला आठवते, शहांच्या आदर्श दृष्टिकोणाची त्या वेळी सहकारी अध्यापक थट्टाच करीत असत. 'रॉयवादी उच्चभ्रू' असा नेहमीचा अपवाद त्यांच्या नावे नोंदत असत. वर म्हटले त्याप्रमाणे विचारवंताच्या आदर्शवादाची पहिली निराशा शहाना या कार्यात

झोंबली असावी.

तथापि, शहा निराश झाले नाहीत. 'इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम' या संस्थेचे काम १९५३ च्या सुमारास त्यानी स्वीकारले. त्या वेळच्या एका सभेत आहिताग्नीच्या माडीवरील दिवाणखान्यात प्रभाकर पाध्ये यांनी या संस्थेची माहिती देणारे व्याख्यान दिले. त्यानंतर तीव्रतेने चर्चा झाली, हे चांगले आठवते.

इंडियन कमिटी, तिचे दिल्लीचे केन्द्र, मुंबई–पुण्याचे 'क्वेस्ट' आणि 'न्यू क्वेस्ट' या नियतकालिकाचे संपादक, अनेक वैचारिक लेखसंग्रहांचे संपादन, अशा कामात शहा मग अधिकाधिक बुडून गेले. मुबईच्या एस. आय. ई. एस. कॉलेजचे पहिले प्राचार्य म्हणून त्यांनी काही वर्षे काम पाहिले आणि उत्तम शैक्षणिक मूल्यांचा पाया त्या कॉलेजला घालून दिला; पण बांधून घेतलेल्या नौकरीत त्यांचे मन रमले नाही. वैचारिक चर्चा. वैचारिक चळवळी, वैचारिक मंथनाचे काम करणाऱ्या संस्था या कार्यातच ते सहजपणे रमले.

त्यांच्या या वैचारिक निष्ठेचा सामाजिक बोलबाला जसजसा होऊ लागला तसतशी उदारमतवादी, सुधारणावादी, मूल्यवादी चळवळी त्याचेकडे मार्गदर्शनार्थ येऊ लागल्या. स्वत.च्या शुद्ध विचारवादी कार्याची अपरिहार्य अंगे म्हणून शहा त्या चळवळीत गुतत गेले. 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ,' 'इंडियन सेक्युलर सोसायटी,' आणीबाणीतील दडपणाविरुद्धच्या प्रकट–अप्रकट चळवळी, जयप्रकाशांच्या दैनंदिनीचे प्रकाशन व वितरण–अशासारख्या प्रत्यक्ष कार्यात ते गुंतत गेले. हमीद दलवाई त्याच्याकडे ओढला गेला व ते हमीदकडे ओढले गेले. मुस्लिम, दलित, पुरोगामी, मतदारप्रबोधक अशा क्षेत्रातील लहानमोठया कार्यकर्त्यांचा संच मोठया विश्वासाने त्यांच्या भोवती जमा झाला होता, त्याच्या अगदी निकटचा झाला होता.

त्यांच्या शुद्ध वैचारिकतेचा विकास स्वाभाविकपणेच प्रबोधनाच्या आणि नंतर सामाजिक बदलाच्या चळवळीत झाला होता. 'विद्याभारती' संस्थेतील आपल्या कार्याकडे ते याच दृष्टीने पाहत असत. सामाजिक बदलाची ही नवी चळवळ त्याच्या नेतृत्वाने हळहळू आकार घेऊ लागली होती. व्यापक नेतृत्वाचा नवा टप्पा त्यांनी गाठला होता. आणखी वीस - पंचवीस वर्षे त्यांना सहजपणे मिळायला हवी होती. तशी ती मिळाली असती तर लोकमान्याच्या अखेरच्या वर्षांतील नेतृत्वाप्रमाणे शहांचे नेतृत्वही व्यापक समाजपरिवर्तनाच्या चळवळीत भरीव कार्य करू शकले असते. त्यांच्याशी होणाऱ्या चर्चात असे जाणवे की, समाजपरिवर्तनाच्या चळवळीला पर्याय नाही हे त्यांनी ओळखले आहे.

शहा गेल्याचे दु.ख त्यांच्या कुटुबियांना, इष्ट मित्रांना वैयक्तिक संदर्भात जे आहे ते आहेच; पण, समाजाला त्याचे परिपक्व नेतृत्व मिळण्याचा जो काळ त्या काळाच्या प्रारंभीच समाज या निःस्पृह, व्रतस्थ, बुद्धिवादी, प्रतिभाशाली नेतृत्वाला मुकला ही आपल्या समाजाची शोकांतिका आहे. त्यांच्याविषयीचा स्नेहादरभाव येथे व्यक्त करताना हे दु.ख मनात आहे.

¤

विचारवंताचे समाजात नेमके स्थान कोणते, तसेच समाजाला त्यांचा नेमका उपयोग कोणता, हे प्रश्न या निमित्ताने मनात येतात. सध्याच्या समाजाला विचारवंत आणि त्यांचा विचार नको आहे असे जे एक मत आज व्यक्त केले जाते त्या मताच्या पार्श्वभूमीवर हे प्रश्न विशेष महत्त्वाचे आहेत.

सामान्य लोकांना विचारवंत नको आहेत का? तर तसे नाही. सामान्यांना त्याच त्या विचाराचा आणि विचारवतांच्या उच्चभ्रूपणाचा कंटाळा आला आहे. नानासाहेब गोऱ्यांच्या विचाराचा कोणी कंटाळा करीत नाही. दुर्गाबाई भागवत जेव्हा आणीबाणीविरुद्ध तत्त्वशुद्ध, खोल विचार व्यक्त करीत होत्या, तेव्हा सामान्यांनी जिवाचे कान करून त्यांचे विचार ऐकले होते. कारण एकच होते. लोकांना या दोघाविषयी खात्री होती–व आहे–की याचा विचार केवळ चितनशील नाही तर तो आचरणशीलही आहे. म्हणजेच त्यांच्या विचाराला सामाजिकतेचा पैलू आहे. कारण आचरण म्हटले की ते सामाजिक असते.

फार थोड्या विचारवताजवळ असे अर्थपूर्ण सामाजिक आचरण आढळते. असे आचरण नसते यासाठी विचारवंताची स्वत.ची काही कारणे असतात. तीही येथे लक्षात घेणे आवश्यक आहे.

विचारवंत हा आपल्या विचाराची एक पद्धती स्वाभाविकच बनवतो. ही पद्धती आदर्श असते. या पद्धतीचे बंधन विचारवंताच्या आचरणावर पडते. एक तर, पद्धती जशी आदर्श असू शकते तसे सामाजिक आचरण आदर्श असू शकत नाही. अशा परिस्थितीत आदर्श पद्धती सोडायची की सामाजिक आचरण सोडायचे? बहुतेक विचारवंत अशा झगडयात सामाजिक आचरण सोडतात. एकेक क्षेत्र सोडत ते हळूहळू एकटे होतात, कोपिष्ट होतात, समाजापासून तुटतात.

दुसरे असे की, स्वत च्या आदर्श पद्धतीबाबत विचारवंताला फार प्रेम वाटते. इतर बहुतेक बाबीपासून तो अलिप्त असतो, असू शकतो; पण स्वतः निर्माण केलेल्या विचारपद्धतीसंबंधी त्याची माया धृतराष्ट्रासारखी आधळी असल्याचेच दिसते, विचारवंत जसजसे प्रौढ होतात, तसतसे समंजस व परिपक्व होण्याऐवजी ते एकारलेले, असहिष्णु आणि स्वत.च्या भूतकालीन स्मृतिस्वप्नात रमलेलेच बहुताशी दिसतात. या एकारलेपणामुळे मग समाज त्याच्यापासून तुटतो.

एकूण काळ जसजसा जातो, तसतसे विचारवत आणि समाज हे एकमेकाना विटत जातात असे दिसते. ही परिस्थिती बदलायला हवी.

ही स्थिती कशी बदलायची व कुणी? दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर आधी देता येईल. ते असे की, ही परिस्थिती बदलण्याची जबाबदारी प्राधान्याने विचारवंतांची आहे. कारण ही परिस्थिती एकूणात वाईट आहे आणि ती बदलली पाहिजे, हे विचारवंतानाच आधी कळणार. तसेच काय केले म्हणजे परिस्थिती बदलेल हेही त्यांनाच अधिक कळणार. तेव्हा याबाबतीत त्यानीच पुढाकार घेतला पाहिजे. सामान्याशी संपर्कच नव्हे तर स्नेह साधण्यासाठी शहा असा पुढाकार घेत असत.

¤

ही परिस्थिती कशी बदलायची? त्याचे उत्तर लोकमान्य टिळकांनी, 'पुनश्च हरिः ॐ' या सुप्रसिद्ध अग्रलेखात दिले आहे. समाजात कार्य करावयाचे तर ते संस्थाच्या माध्यमानेच करता येते. यासाठी ज्यास कार्य

करावयाचे त्याने एक तर जुन्या संस्थांचा उपयोग स्वत.स पाहिजे तसा नव्या तत्त्वांनी करून घ्यावा अथवा जुन्या संस्थाचा असा नवा उपयोग शक्य नसेल तर स्वतःच्या तत्त्वांशी सुसंगत कार्य करण्यासाठी नव्या संस्था चालू कराव्यात–असे लोकमान्यांच्या विवेचनाचे सार आहे. शहानी हे दोन उपाय सतत केले. संस्था, संघटित कार्यक्रम, पत्रके, नियतकालिक, व्याख्याने, चर्चा असे अखंड सत्र त्यानी आयुष्यभर चालविले.

वर्षापूर्वी विश्रब्ध गप्पात ते एकदम बोलून गेले. म्हणाले, 'भावे, आय अॅम स्ट्रगलिंग फॉर सर्व्हायव्हल!'

मी चमकलो. कारण बोलणे विचारवंतांच्या सामाजिक परिणामकारकतेविषयी चालले होते. माझे चमकणे त्यानी ओळखले आणि खुलासा केला. म्हणाले, 'सर्व्हायव्हल अॅज अ थिंकर. समाजाला विचारवंत नकोसा वाटतो तो दोन कारणांनी. एक म्हणजे समाजाचे स्वत.चे अज्ञान, दुसरे म्हणजे विचारवंतांची आदर्श उदासीन अलिप्तता. समाजाचे अज्ञान नाहीसे व्हायचे तर विचारवंताने ही उदासीनता दूर केली पाहिजे. मी जेव्हा असा उदासीनतेने घेरला जातो, तेव्हा विचारवंत म्हणूनही मी संपेन की काय अशी शंका मला छळते. देन आय बिगिन माय स्ट्रगल फॉर सर्व्हायव्हल अॅज अ थिंकर.'

याच भेटीत एका कारणासाठी शहानी माझे भावनाभराने अभिनंदन केले होते. यानंतरच्या बोलण्याने त्यांच्या अभिनंदनाचे रहस्य माझ्या खरे ध्यानात आले आणि माझा त्यांच्याविषयीचा आदर वाढला. मानवेन्द्रनाथ रॉय यांच्यापासून त्यांनी स्फूर्ती घेतली असणार हेही नक्की पटले.

¤

शहांच्या लेखी विचार, वैचारिकता, वैचारिकेतेने सुसंगत अर्थपूर्ण झालेला आचार आणि या समाजपरिवर्तनाच्या प्रयत्नात होणारी अपरिहार्य परिणती हे सारे एकात्म व्रत होते.

विचारवंतांचा आजचा गप्पपणा पाहिला की अंतर्मुख होऊन शहांच्या या व्रताची, व्रतस्थवृत्तीची आठवण होते. ही व्रतस्थवृत्ती कमी झाली आहे का, कमी झाली असल्यास का कमी झाली आहे, याचा विचार साऱ्याच विचारवंतांनी आत्मपरीक्षणाच्या भावनेने करणे आज आवश्यक नव्हे, तर निकडीचे झाले आहे. □

---

# आभार

यंदा खालील व्यक्ती व संस्थानी साप्ताहिक 'माणूस', 'साप्ताहिक मुद्रण' व 'राजहंस प्रकाशन' याजकडे दीपावलीनिमित्त शुभेच्छा-पत्रे पाठविली आहेत. या सर्वांचे 'माणूस' परिवारातर्फे मन.पूर्वक आभार!

प्रशांत प्रिंटर्स, १४५३ कसबा पेठ, पुणे–११
श्री. ना. वा. भावे, पिंपरी-चिंचवड नगरपालिका, पुणे १८.
स्पिन इंडिया, भोसरी इण्डस्ट्रिअल इस्टेट, पुणे २६.
अमित लुब्रिकंट्स अॅंड केमिकल्स, वाकडेवाडी, पुणे ३.
अजय इंजिनियरिंग वर्क्स, वाकडेवाडी, पुणे ३.
अरविंद इंजिनिअरिंग वर्क्स, वाकडेवाडी, पुणे ३.
श्री. एस. एन. भागवत, मालाड, मुंबई–६४
सायकल टूरिस्ट अॅसोसिएशन ऑफ इंडिया, शनिवार पेठ,पुणे–३०
व्ही. बी. अभ्यंकर अॅण्ड ब्रदर्स, डेक्कन जिमखाना, पुणे ४.
श्री. भा. द. वाळुंजकर, मुरगुड, जि. कोल्हापूर
श्रीमती मंगला कुलकर्णी, वर्टी कॉलनी, नासिक–१.
श्री. एस. पी. कुलकर्णी, देना बँक, एम. जी. रोड, पनवेल.
रचना प्रॉडक्टस्, ८४९ सदाशिव पेठ, पुणे–३०.
सह्याद्री ट्रेडर्स, ४७८ बी, शिवाजीनगर, पुणे ५.
हिरजी केशवजी आणि क., शिवाजी रोड, परभणी.
तेजपालजी खिमजी शाह, स्टेशनरोड, औरंगाबाद.
श्री. शरद पवार, महेश्वरी निवास, जगमोहनदासमार्ग, मुंबई ३६.
सकाळ पेपर्स प्रा. लि., ४१३/१/१ ए. गांधीनगर, कोल्हापूर.
श्री. आर. बी. गौरकर, अध्यापक कॉलनी, बार्शी.
श्री. राम डिंबळे, ज्ञानप्रबोधिनी प्रणित शिवगंगाखोरे विकास-योजना, खेडशिवापूर, ता. हवेली, जि. पुणे.
प्रा. एन. एस. मुजावर, प्रा. उदय जोशी, श्री. प्रफुल्ल म्हात्रे, ११६४ अलिबाग (रायगड), अलिबाग.
श्री. अण्णा जोशी आणि सौ. उर्मिला जोशी, ७०४ सदाशिव पेठ, पुणे ३०.
श्री. सी. पी. कुलकर्णी, बँक ऑफ बरोडा, सुभाषनगर ब्रँच, पुणे–४११००२.
श्री. प्रभाकर गद्रे व सौ. आशा गद्रे, मुलुड, मुलुंड (मुंबई).
श्री. विनय गुणे, चंद्रशेखर चौक, संगमनेर
श्री. पी. एस. इलेक्ट्रिकल्स, आणि पराग एंटरप्राइझेस, पुणे.
श्री. चंद्रशेखर राजे, कुटुंबीय, डोंबिवली पूर्व.
श्री. रायकर न्यूजपेपर एजन्सी, न्यू मार्केट, मडगाव–गोवा.

श्री. धर्मण्णा सादूल, चेअरमन, सोलापूर जिल्हा औद्योगिक सहकारी बँक, सोलापूर.

कमआर्टस् १५२५ सदाशिव पेठ, पुणे–३०.

श्री. स. शि. भावे १२१४ शिरोळे रस्ता, पुणे ४.

श्री. शरद व्ही. ओक व श्रीमती स्वाति एस. ओक, ओक सन-ब्रेकर्स, पुणे.

श्री. श्याम भिडे, टिळकनगर, वृंदावन सोसायटी. डोंबिवली पूर्व.

श्री. प्रकाश तपस्वी आणि परिवार, नागपूर.

भार्गव परिवार, वेंकटेशमार्ग, लातूर

श्री. सी. एस. भाले. भाले इस्टेट, वाकडेवाडी, पुणे ३.

अॅंटिबायोटिक्स रिक्रिएशन क्लब, एच. ए. वसाहत, पिंपरी पुणे १८.

श्री. सुधीर जोशी, जे. के. सावंतमार्ग, दादर–मुंबई ४०००२८.

श्री. दिलीप डी. पाठक, अहेर अपार्टमेंट्स, अशोकस्तंभाजवळ, नासिक.

श्री. अविनाश आपटे, कामगारसदन, श्रीरामपूर.

श्री. अनिलकुमार वासुदेव आचार्य, फडके वाडा, पनवेल–कुलाबा.

उत्तम जाहिरातवितरक, २८० शनिवार पेठ, पुणे ३०.

श्री. पी. डी. सोहोनी व सौ. वसुधा सोहोनी, नवी पेठ, पुणे–३०.

मे. इंडियन मिनरल अॅन्ड फर्टिलायझर कंपनी, कोल्हापूर.

श्री. सी. व्ही. शाह, श्री. संजय सी. शाह, श्री. राजेश सी. शाह, २३१ नाना पेठ, पुणे–२.

श्री. आनंद वागलकोटे, ब्राह्मणपुरी, मिरज

डेव्हिड ब्राउन ग्रीव्हज लि., पार्क गिअर वर्क्स, चिंचवड, पुणे १९

बँक ऑफ महाराष्ट्र, लोकमंगल १५०१ शिवाजीनगर, पुणे ५

नांदेड न्यूज पेपर एजन्सी, वझिराबाद, नांदेड.

मे. जे. एल. वावळे अॅंड. कं. एवरेस्ट हाउस अॅनेक्सी डोंबिवली (पश्चिम) ४२१२०२.

श्री. गोपालजी ठक्कर, घोलेरोड, पुणे ४.

श्री. रमेश पाठक, पोर्तुगीज-चर्चसमोर, दादर–मुंबई २८.

बालनाट्य राधानिवास, टिळक रोड, दादर–मुंबई १४.

श्री. एच. आर. बर्वे, इन्शुअरन्स एजंट, नागनाथपाराजवळ. पुणे ३०.

स्वस्तिक ट्रॅक्टर्स, स्वारगेट, पुणे ३७.

डायरेक्टोरेट जनरल ऑफ इन्स्पेक्शन अॅंड पब्लिक रिलेशन्स, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र मंत्रालय, मुंबई–३२

डॉ. उल्हास आणि पन्ना लुकतुके, विजय टॉकीजजवळ, लक्ष्मीरोड, पुणे ३०

संस्कृति संवर्धन मंडळ, संगमनेर.

भारत टाइप फाउंड्री, २५० क–१५ शनिवार पेठ, पुणे ३०

श्री. सुरेश शंकर खेर, बी / १० क्रिस्टल कॉलनी, माहीम–मुंबई १६

श्री. दीपक दळवी, ३९४ टिळकवाडी, बेळगाव ६

श्री. बाबू ल. उडुपी, अन्नपूर्णा, अंबलपाडी, उडुपी

आज् अॅडव्हर टाइझिंग, जंगलीमहाराजरस्ता, पुणे–४

बालसन्स प्लास्टिक इंडस्ट्रीज प्रा. लिमिटेड, बुकाव वुल्फसमोर, पिंपरी–पुणे ४११०१८

आर्ट अलोन, ३५१ शनिवार पेठ, पुणे–३०

दीक्षित देसाई फर्म्स, १२४३ सदाशिव पेठ, पुणे–३०

डॅगर फार्स्ट टूल्स लिमिटेड, पहिला पोखरन रोड, ठाणा–४००६०६

चंद्रशेखर मराठे, नासिकरोड, नासिक

फिलिप्स पेइको इलेक्ट्रॉनिक्स अॅंड इलेक्ट्रिकल्स लिमिटेड, मुंबई–पुणे

श्री. यशवंत व सौ. सुजाता ठकार, मुंबई

सी. व्ही. गोडे, मुंबई

उल्हास राजज्ञ, धुळे

श्री. सुहास व सौ. माधवी बाक्रे, टिळकनगर, ठाणे (पूर्व)

डॉ. विजय व सौ. लता बीडकर, पेठ, जि. नासिक

एम्. के. पब्लिसिटी, शिवाजी रोड, बेळगाव

श्री. प्रदीप भिडे, इ–मर्क इंडिया लि. मुंबई

श्री. सु. ल. सोमण, ठाणे

□


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

अवतीभवती । शरद कृष्णन्

# दीपावली आतषबाजीसाठी कामगार मुलांचे शोषण

देशामधील शोभेच्या दारूचे जे एकूण उत्पादन आहे त्याच्या ९० टक्के उत्पादन तामिळनाडूमधील शिवकाशी येथे असलेल्या विविध खाजगी कारखान्यांतून होते. दोन महिन्यांपूर्वी शिवकाशी येथे जो जबरदस्त अपघात झाला त्यामध्ये ३२ कामगार मृत्युमुखी पडले. त्यामध्ये दहा वर्षांच्या आतील दोन कामगार मुलाचा समावेश होता. या आघातामुळेच आतषबाजीसाठी शोभेच्या दारूचा देशभर पुरवठा करणारे हे शिवकाशी एकदम प्रकाश झोतामध्ये आले. 'इलस्ट्रेटेड् विकली'च्या चालू अंकामध्ये तेथे कामगार मुलाची कशी सरंजामी पद्धतीने पिळवणूक होते याबाबतचा तपशील प्रसिद्ध झाला असून बाहेर आलेली माहिती खरोखरच धक्कादायक आहे. आजही तेथील विविध कारखान्यात काम करणाऱ्या मुलाकडून चांगले १२ ते १५ तास काम करवून घेण्यात येते. शिवकाशी येथील दारूकाम, तसेच काड्यापेटचा बनवणाऱ्या विविध कारखान्यात कामगारांची संख्या आहे ७५ हजार! या पंचाहत्तर हजारापैकी ४५ हजार कामगार हे पंधरा वर्षांच्या आतील असून त्यापैकी दहा हजार तर पाच वर्षांच्या आतील आहेत. ही परिस्थिती धक्कादायक असली तरी वस्तुस्थिती आहे. ज्यांना धड मोडकेतोडके बोल बोलता येत नाहीत अशा कच्च्याबच्च्यांना कमालीच्या निष्ठुरपणे कामाला जुंपले जाते. या शेंबूडपुशा पोराना आरोग्याला तापदायक ठरेल असे काम दिले जाते. वेतन नाममात्र. सुट्टी नाहीच आणि कामाच्या तासांवर कोणतेही नियंत्रण नाही. काड्यापेट्यामध्ये काड्या भरण्याचे काम करणाऱ्या मुलाना शंभर काडेपेटचा असलेल्या पन्नास फ्रेमस् पूर्ण केल्यावर तेरा पैशाचा मोबदला दिला जातो! लहान मुलाना कामावर ठेवू नये, असे कायदे आहेत. त्याबाबत अनेक नियम आहेत; परंतु ते सर्व धाब्यावर बसवून, पाच-सात वर्षांच्या मुलांपासून सर्वांकडून कसून काम करून घेतले जाते. कायदा तर सोडाच, पण साध्या माणुसकीचा दृष्टिकोनही याबाबत स्वीकारला जात नाही.

तामिळनाडूमधील रामनाथपुरम् या जिल्ह्यामध्ये शिवकाशी हे शोभेची दारू तयार करणारे देशामधील सगळयात मोठे केंद्र आहे. देशामध्ये तयार होणाऱ्या काड्यापेट्यांपैकी ६० टक्के काड्यापेट्या शिवकाशीच्या विविध कारखान्यात काम करणारी मुले रबत ओकून तयार करतात. कुटुंबेच्या कुटुंबे कारखान्यावर राबता घालत असतात. कारखान्याचे मालक बाल-कामगारावर खूष असतात. मोबदला नाममात्र; काम चापून. शिवकाशीच्या जवळपासच्या खेड्यातून गाड्या-बसेस पाठवल्या जातात. पालकांना दारिद्र्यामुळे मुलांचे ओझे झालेलेच असते. पोरानी रुपया - दोन रुपये मिळवून आणले तर हवेच असतात. मुलांना या घाण्याला जुंपण्याबाबत कारखानदार इतके उत्सुक आहेत की चागला ४०-५० किलोमीटरपर्यंतचा परिसर चाळून काढून ते मुले पकडून आणतात. कित्येक मुलांना वेळेवर कामावर पोचण्यासाठी रात्री २॥-३ वाजता उठवण्यात येते व बसमध्ये कोंबून कारखान्यात नेण्यात येते. त्यांना सलग ११-१२ तास कामाला जुंपले जाते. चार घास अन्न खाऊन ती आडवी होतात न होतात की पुन्हा कामाची वेळ येते. त्यानी असे काम केल्याखेरीज देशाची दिवाळी साजरी होणार कशी आणि पुण्या - मुंबईसारखी शहरे कानाला दडे बसवणाऱ्या दणकेबाज फटाक्यानी निनादणार तरी कशी?

१९७६ साली राज्य सरकारने या कारखान्यांबाबत चौकशी करण्यासाठी हरबन्स सिंग कमिटीची स्थापना केली होती. या समितीने मुलांना पूर्ण सरक्षण देण्याची कल्पना मान्य केली असली तरी जर मुलांना पूर्ण बंदी केली तर अनेक कारखान्यांवर विपरित परिणाम होईल, असे मतही नोंदले आहे. या कारखान्यात काम करायचे नसले तर दुसरा पर्याय नसल्याने मुलांना ५व्या वर्षापासून मरेपर्यंत हेच काम करावे लागते. १६ वर्षांखालील मुलांना काम देऊ नका असे कायदा ओरडून सागत असला तरी कारखानदार गावोगाव एजंट पाठवून मुले पकडूनच आणतच असतात. पालकाना थोडे-फार पैसे देऊन एजंट त्याच्या मुलांचे जवळजवळ मालकच बनतात आणि ही मुले मग आपल्या सगळ्या बालसुलभ भावना मारून यंत्राप्रमाणे काम करतात.

कायदापालनाचे महत्त्व तरी वर्णन काय करावे? आधी पोलीस लोक कारखानदाराच्या वाटेला फारसे जात नाहीत. त्यात एखाद्या वेळेला एखाद्या कारखानदारांवर लहान मुलांना कामाला लावण्याबाबत खटला भरला तर न्यायालयाची शिक्षा काय? एका खटल्यात मालकाला दंड झाला १०० रुपये, तर दुसऱ्या खटल्यात केवळ २५ रुपये! मग खटले भरुन फायदा तरी काय? बहुतेक सर्व कारखान्यांतून व्यवस्थापक, पर्यवेक्षक व हिशेबतपासनीस हेच काय ते महिना पगार घेणारे. मोठ्या कामगाराना साप्ताहिक पगार आणि १२ तास खपणारी मुले रोजंदारीवर आणि रोजी किती? २ ते ४ चार रुपये फक्त! कारखान्यामध्ये केमिकल्स व अन्य स्फोटक पदार्थ ठेवण्याबाबतचे जे नियम आहेत तेही उघड उघड धाब्यावर बसवून मुलांना अत्यंत धोकादायक परिस्थितिमध्ये कामाला लावले जाते. १९ सप्टेंबरला झाला तसा स्फोट होऊन पाच - पन्नास माणसे मेली की जरा बोंबाबोंब उठते. आठवड्याभरात ती निवली की आपल्या अलिशान राजवाडापद्धतीच्या बंगल्यामधून राहणारे हे कारखानदार पुन्हा मूळ पदावर येतात. कारण, अपघात कधी तरी होणे आणि दिवाळी, लग्नसमारंभ, निवडणुका या वेळी होणाऱ्या आतषबाजीसाठी दारूगोळा मात्र सततच लागतो. मग ते तरी बापडे काय करणार?

## □ गढवाल लोकसभा पोटनिवडणूक

विविध राज्यांतील विधानसभेच्या बावीस जागाच्या तसेच लोकसभेच्या तीन जागांच्या पोटनिवडणुका पुढील आठवड्यात होत आहेत. या निवडणुकापैकी विशेष महत्त्वाची निवडणूक अर्थातच हेमवतीनंदन बहुगुणा उमेदवार असलेल्या गढवाल मतदारसंघामध्ये होत आहे. येत्या बावीस नोव्हेंबर रोजी ही निवडणूक होत आहे. याच मतदारसंघातून श्री. बहुगुणा हे इंदिरा काँग्रेसच्या तिकिटावर निवडून गेले होते. पुढे त्यांनी इंदिरा काँग्रेस सोडली, आणि विशेष महत्त्वाची आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्यांनी खासदारकीचाही राजिनामा दिला. स्वाभाविकपणे पोटनिवडणूक घ्यावी लागली. स्वत:च्या लोकशाही समाजवादी पक्षातर्फे बहुगुणा मैदानात उतरले. आधीच त्यांच्या राजकीय कारकीर्दीचे वागे झालेले, त्यात जर ते ही निवडणूक हरले असते तर त्यांचे उरले सुरले महत्त्वही संपुष्टात आले असते. काय वाटेल ते करून ही निवडणूक जिंकायचीअसा चंग त्यानी बाधला होता, तर काय वाटेल ते करून त्याना पराभूत करायचे, अशा ईर्षेने इंदिरा काँग्रेस मैदानात उतरली. पोटनिवडणुकीसाठी सहसा महामंत्री सभा घेत नाहीत. पण इंदिराजींनी अपवाद केला. त्यानी स्वत: निवडणूक सभेमध्ये भाषण केले. बहुगुणा यांनीही झंझावती प्रचार केला. वातावरण चांगलेच तापले. दोन्ही बाजूनी गैरमार्गांचा उदंड वापर झाला. बहुगुणाच्या विरोधामध्ये उ. प्र. च्या मंत्रिमंडळामधील एक राज्यमंत्री सी. एम. एस. नेगी निवडणूक लढवत होते. सर्व सरकारी यंत्रणा मुक्तपणे निवडणूकप्रचाराचे काम करत होती. अशा या अटीतटीच्या निवडुकीमध्ये मतदान तर झाले. त्यानंतर लगोलग बहुगुणा यानी ५६ मतदान केंद्रावर फेर मतदान घ्यावे अशी मागणी केली; तर इंदिरा काँग्रेसने बहुगुणा यांच्या पाठिराख्यांनी मतपेट्या पळवल्याचा आरोप करून बावीस केंद्रावर फेरमतदानाची मागणी केली. निवडणूक आयोगाने चौकशी केली आणि ही संपूर्ण पोटनिवडणूकच रद्दबातल ठरवली.

हे असे काही होईल हे बहुगुणा यानाही अपेक्षित नव्हते. फक्त काही मतदान केंद्रावर, फेरमतदान होईल, असा त्यांचा अंदाज होता. निवडणूक आयोगाने सपूर्ण निवडणूक रद्द ठरवून फेरमतदानाबाबतचे आदेश दिल्यावर तेही आश्चर्यचकित झाले. त्यांच्या पाठिराख्याच्या मते, केवळ काही मतदान केंद्रावर फेरमतदानाची मागणी मान्य झाली असती तर बहुगुणा यशस्वी झाले असते. फेरमतदानाचा आदेश बहुगुणांना त्रासदायक जाईल असेही त्याना वाटले परंतू; तरीही बहुगुणा–समर्थकांची पहिली प्रतिक्रिया आपण जणु काही निवडणूक जिंकली, अशा थाटाची होती. फेरमतदानाचे आदेश दिले गेल्याने सरकारी पक्षाचे नाक कापले गेले होते. बहुगुणा यानी दिल्लीमध्ये पत्रकार परिषद घेऊन निवडणुकीमध्ये झालेले गैरप्रकार चव्हाट्यावर आणले. तर अशा गाजलेल्या पोटनिवडणुकीचे हे फेरमतदान आता बावीस नोव्हेंबर रोजी होत आहे. स्वाभाविकपणे या फेरमतदानावावतही चांगलीच उत्सुकता आहे. बहुगुणा अर्थातच मैदानामध्ये असून त्याना एक भाजपचा अपवाद वगळता अनेक विरोधी पक्षाचा पाठिंबा आहे. बहुगुणा निवडणूक प्रचारामध्ये दंग असून फेर मतदानामध्ये यश मिळवण्याचा ते शर्थीने प्रयत्न करत आहेत. इंदिरा काँग्रेसने गेल्या वेळेला हिमाचल प्रदेश आणि हरयाना या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना निवडणूक प्रचारात लक्ष घालण्यास सांगितले होते. आता फेरमतदानाचे वेळी स्थानिक नेत्यांच्या हाती निवडणूक प्रचाराची सूत्रे राहावीत, असे आदेश राजीव गांधी यांनी दिलेले आहेत. इंदिरा काँग्रेसने हरयानामधील पोलीस आणवून जे गैरप्रकार गेल्यावेळी केले होते त्याचेच भांडवल बहुगुणा करत आहेत. निवडणुकीमध्ये सत्तेचा मुक्त वापर केला गेल्याने लोकाच्या मनातही राग आहेच. बहुगुणा नेमक्या त्याच गोष्टीवर फुंकर मारत आहेत. या फेरमतदानाबाबत देशात इतरत्र उत्सुकता असली तरी गढवाल मतदार संघामध्ये फार मोठी उत्सुकता दिसून येत नाही. बहुगुणा यांच्याबद्दल गढवाल मतदार संघाला तसे ममत्व. बहुगुणा अल्पसंख्य जमातीच्या बाबत, विशेषत: मुसलमानाच्याबाबत विशेष उदार दृष्टिकोन स्वीकारत असल्याने या जमातीचा त्यांना केवळ पाठिंबा आहे असे नव्हे, तर त्याच्यासाठी या समाजामधील मंडळी काम करण्यासही तयार आहेत. या उलट सत्ताधारी पक्ष निवडणूक प्रचाराचे कार्य जास्त जागरुकतेने करत आहे. प्रत्यक्ष गढवाल लोकसभा मतदारसंघामध्ये इंदिरा काँग्रेसची ताकद बेताची आहे. इंदिराजीचे नाव हेच या पक्षाचे सगळ्यात मोठे भांडवल आहे. अमेथी मतदारसंघामध्ये राजीव गांधीच्या निवडणुकीची सूत्रे संभाळणारे खासदार वीर बहादुर सिंग हे सत्ताधारी पक्षातर्फे निवडणुकीचे काम करत असून त्यांना बरेली मतदार संघामधील इंदिरा काँग्रेसचे खासदार अरुण नेहरू सहकार्य करत आहेत. या मंडळीच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीचे काम करण्यासाठी स्थानिक पातळीवरील ३०–४० कार्यकर्त्यांची निवड करण्यात आल्याचे इंदिरा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री. विश्वंभर पांडे यानी सागितले आहे. या फेरमतदानाचे खरे महत्त्व बहुगुणा याच्याच दृष्टीने आहे. अनेक पक्षातून फेरी मारून आल्यावर आता स्वत:च्या राजकीय पक्षाचा झेंडा हाती घेऊन उभे असलेले बहुगुणा या फेरमतदानामध्ये यशस्वी झाले तर त्यांच्या दृष्टीने तो मोठा विजय मानावा लागेल. इंदिरा काँग्रेस या निवडणुकीमध्ये यशस्वी झाली तर उत्तमच. बहुगुणांची स्वत:ची ताकद नाही. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये ते यशस्वी ठरले कारण इंदिरा काँग्रेसचे उमेदवार म्हणून त्यानी ती निवडणुक लढवली होती. [आज त्यानी पक्ष सोडला आणि ते पराभूत झाले, असा टेंभा इंदिरा काँग्रेसला मिरवता येईल. समजा, पदरी पराभव आला तर मात्र या पक्षाचे काही फार मोठे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही.

बावीस नोव्हेंबरला होणाऱ्या या निवडणुकीपाठोपाठ २९ नोव्हेंबरला लोकसभेच्या अन्य तीन आणि दहा राज्यामधील विधान सभेच्या बावीस जागासाठी मतदान होत आहे. मतदानाच्या या फेरीत जनमताचा कौल काय पडतो यावर वारे कोणत्या दिशेने वाहात आहे याचा अदाज येणार आहे.

## □ केरळ-एक प्रॉब्लेम स्टेट

केरळमधील नायनार मंत्रिमंडळाने राजिनामा दिल्यानंतर राज्यपालांच्या अहवालाप्रमाणे तेथील विधानसभा तहकूब ठेवण्यात

आली असून नवीन मंत्रिमंडळ बनवण्याच्या दृष्टीने हालचालीना प्रारंभ झाला आहे. एक गोष्ट निश्चित, की केरळ विधानसभेमधील सध्याचे विविध पक्षाचे बलाबल पाहता तेथे सुस्थिर सरकार स्थापन होण्याची शक्यता नाही. सध्या अस्तित्वात असलेल्या दोन आघाड्या आहेत त्याच स्वरूपात कायम राहिल्या तर मंत्रिमंडळ बनणे संभवनीय नाही. सत्ताभ्रष्ट झालेल्या डाव्या आघाडीमागे अजूनही ६१ आमदाराचे पाठबळ आहे. १४० सदस्य-संख्या असलेल्या गृहामध्ये आजही ही डावी आघाडी सर्वांत शक्तिशाली आहे. या आघाडीमध्ये डावे कम्युनिस्ट (३४), उजवे कम्युनिस्ट (१७), आर. एस. पी. (५), मुस्लिम लीग (५) या पक्षाचा समावेश आहे. विधानसभेचे सभापती ए. पी. क्युरिअन हे डाव्या कम्युनिस्ट पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेले आहेत. डेमॉक्रॅटिक युनायटेड फ्रंट ही गृहामधील दुसरी मोठी आघाडी आहे. या आघाडीचे संख्याबळ ४१ असून त्यामध्ये इंदिरा कांग्रेस (१७), इंडियन मुस्लिम लिग (३४), केरळ कांग्रेस जोसेफ गट (६), एन. डी. पी. (३) व पी. एस. पी. (१) असे पक्षबळ आहे. स्वाभाविकपणे जे या दोन्ही आघाड्यामध्ये नाहीत ते सदस्य काय करणार ? या प्रश्नाच्या उत्तरामध्ये संभाव्य मंत्रिमंडळाची जडणघडण घडलेली आहे. शरद कांग्रेस, केरळ कांग्रेसचा मणि गट व जनता पक्ष या सर्वांचे मिळून संख्याबळ आहे ३६ ! आता यापैकी मणि गट व शरद कांग्रेस हे डाव्या आघाडीच्या सरकारमधून बाहेर पडल्यानेच मंत्रिमंडळ कोसळले. आता जे नव्याने प्रयत्न होत आहेत त्यामध्ये शरद कांग्रेस आणि इंदिरा कांग्रेस परस्पर सहकार्य करणार, असे दिसते आहे. शरद कांग्रेसने केरळ मंत्रिमंडळ जडणघडणीबाबत जी परस्परविरोधी भूमिका घेतली त्यामुळे या पक्षाचे हसे झाले आहे. केरळमध्ये इंदिरा कांग्रेसला सहकार्य करणार नाही अशी ताठर भूमिका घोषित होऊन २४ तास होतात न होतात तोच सहकार्याचा हात देण्याची वेळ यावी, यातच शरद कांग्रेसच्या केरळमधील राजकारणाबाबतच्या केविलवाण्या अवस्थेचे दर्शन होते. काही नेत्याचा या युतीला विरोध असला तरी केरळमधूनच वाढते दडपण येत असल्याने शरद कांग्रेसला ताठर भूमिका सोडून देऊन लवचिक भूमिका घेणे भाग पडले. केरळ कांग्रेस मणि गट आणि शरद कांग्रेस याचे सहकार्य मिळाले तर कदाचित डेमोक्रॅटिक युनायटेड फ्रंटला नवीन मंत्रीमंडळ बनवता येईलही. परंतु जेमतेम बहुमत मिळवू शकणारे हे मंत्रिमंडळ फार दिवस तग धरू शकणार नाही; आणि अखेरीस विधानसभा विसर्जित करून मध्यावधी निवडणुका घ्याव्याच लागतील. तसे झाले तर संधीसाधू युती करण्यासाठी धावाधाव करणारांना त्याची किंमत मोजावी लागेल. सत्ता संपादन करण्यासाठी धडपड करणारांना या गोष्टीची कल्पना नाही, असे नाही. इंदिरा कांग्रेसचे नेते करुणाकरन यानी असे स्पष्ट विधान केले आहे की, डावे कम्युनिस्ट आणि इंदिरा कांग्रेस याना वगळून जर मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न झाला तर तो टिकू शकणार नाही. डावे कम्युनिस्ट आणि इंदिरा कांग्रेस यांच्यामधील लठ्ठालठ्ठी पाहता हे पक्ष जवळ येण्याचा संभव नाही. केरळमध्ये सत्ताग्रहण करण्याचा प्रयत्न करणारे कोणतेही आघाडी सरकार हे अखेरीस संधीसाधू सरकार ठरणार असल्याने या संभाव्य सरकारवर जनतेचा तसा रागच राहील. अर्थात आहे ही परिस्थिती काही फार दिवस ठेवता येणार नाही. राज्यपाल ज्योति वेंकटचलम् यांना अखेरीस कोणाला तरी पाचारण करावेच लागेल. खेरीज, अस्थिर सरकार हा केरळचा जवळजवळ स्थायीभाव असल्याने कसेबसे बहुमत मिळवून सत्ता राबवणाऱ्या शासनाचे अप्रूप तेथील जनतेला नाही. अच्युत मेनन यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करणाऱ्या आघाडी सरकारचा अपवाद वगळता केरळला स्थिर सरकार मिळू शकलेले नाही. राष्ट्रपतीच्या राजवटीचेही केरळला फारसे अप्रूप नाही. कारण आता सहाव्या वेळी तेथे राष्ट्रपती राजवट लागू होत आहे. म्हणजे केवळ स्थिर शासनाच्या दृष्टीने विचार केला तर गेली २५ वर्षे केरळ म्हणजे एक 'प्रॉब्लेम स्टेट' आहे. पंचवीस वर्षांपूर्वी जेव्हा केरळची फेररचना करण्यात आली तेव्हा राष्ट्रपती राजवट होती आणि आता राज्याचे रौप्यमहोत्सवी वर्षही राष्ट्रपती राजवटीमध्येच साजरे होत आहे. राज्याच्या त्रावणकोर, कोचिन व मलबार या तिन्ही विभागांना आपल्या आर्थिक गरजांसाठी राज्याबाहेरून येणाऱ्या पैशावरच अवलंबून रहावे लागते. गल्फच्या आखातात काम करणाऱ्या केरळवासियाकडून पैशाचा प्रचंड ओघ सतत वाहात आहे. या देशातून साधारणपणे ४०० कोटी रुपये केरळमध्ये येतात, असा एक अंदाज आहे. पण राज्यामधील अस्थिर राजकीय परिस्थितीमुळे तांदूळ आणि केळीच्या पानापासून प्रत्येक गोष्टीत हे राज्य परावलंबी राहिलेले आहे. गेल्या वर्षी मालमोटार-वाहतूक करणाऱ्या व्यवसायिकानी संप केला होता त्या वेळी या परावलंबित्वाची तीव्रतेने जाणीव झाली. अर्थात वाहाता पैसाच एवढा प्रचंड होता की, नजरेत भरण्याइतकी संपन्नता आल्याने शेती-उत्पादन वाढले, काही मोठ्या उद्योग धंद्यानाही प्रारंभ झाला. परंतु अतिरिक्त वीजपुरवठा, सुशिक्षित व व्यवसायकुशल मंडळीची सहज उपलब्धता, पुरेसा पाणीपुरवठा, आणि समाधानकारक वाहतूक-व्यवस्था असूनही राज्याचा जेवढा आर्थिक विकास अभिप्रेत होता तेवढा होऊ शकलेला नाही. आता समजा फेरनिवडणुका झाल्या तरी कोणत्याही एकाच पक्षाला निर्विवाद बहुमत मिळेल असा संभव नाही. कम्युनिस्ट, मुस्लिम लीग, कांग्रेस राज्यपातळीवरील पक्ष अशा सगळ्याचीच थोडी थोडी ताकद आहे. आता आघाडी सरकारला कंटाळून जनतेने एखाद्या पक्षाचा पाठपुरावा केला तर गोष्ट वेगळी. अन्यथा, आघाडी सरकार हे केरळच्या राजकारणाचा स्थायीभाव असून स्थानिक जनतेने ही वस्तुस्थिती मान्य केली आहे. अडचण येते ती एवढीच की, सरकारला बहुमत काठावरचे असेल तर शासकीय कामकाज पुरेसा वेग घेऊ शकत नाही आणि त्याचा राज्याच्या विकास-कार्यक्रमावर परिणाम होतो. सरकार बनवणे आणि सरकार तोडणे या उद्योगात राजकीय पक्षांची ताकद खर्ची पडते. आत्ताही नायनार यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार कोसळले आहे आणि नवीन सरकार बनवण्याच्या प्रयत्नाना वेग आला आहे !

□



काल-परवापर्यंत उंबरठ्याच्या आत-बाहेरच घुटमळणारा राधेचा श्याम एक दिवस ऑफिसात गेला आणि भारतातर्फे परदेशी जाण्यासाठी निवड झाल्याचं पत्र त्याच्या हातात पडलं. श्यामच्या अनुभवाचं आकाश ठायी ठायी फाटलं. फाटलेल्या पोत्यातून भसाभसा दाणे ओघळावेत तसा असंख्य अनुभवांचा श्यामच्या अंगावर चहू बाजूंनी माराच होऊ लागला.

' माणूस 'च्या दिवाळी अंकातच श्यामचं हे आगळं अनुभव-विश्व सादर करण्याचा मनोदय होता; पण काही अडचणींमुळं ते त्या वेळी देता आलं नाही. म्हणून आता मुद्दाम दोन भागांमध्ये देत आहोत.

# श्यामची परदेश-प्रवासकथा ( पूर्वार्ध )

● फिरोझ रानडे ●

श्यामचे नशिबच मोठे विचित्र आहे. बाकी सर्व लोकाना ज्या गोष्टीचा खूप त्रास होतो ती कामे श्यामची विनासायास होऊन जातात व बाकी जगाची जी कामे विनासायास होऊन जातात ती श्यामची होता होत नाहीत व जीव रडकुंडीस येतो.

त्याचे स्वत.चे लग्न व्हायला खूप सायास पडले होते; म्हणजे मनासारखी मुलगी मिळण्याच्या दृष्टीने; तर त्याच्या मुलीचे लग्न अगदी विनासायास झाले होते. जावई व सासरची मंडळी–तोडदेखल्या म्हणतात तसे छापदेखल्या म्हणावयाचे नाही–म्हणजे फक्त छापण्याकरता म्हणावयाचे नाही – तर खरच चांगली मिळाली होती.

हे 'छापदेखल्या' काय प्रकरण आहे ? माणसाच्या मनात काही जरी असले तरी काही छापायचे म्हणजे माणूस अगदी वेगळे-जगाला व ज्याच्याबद्दल लिहिले आहे त्याला बरे वाटेल असेच–छापत असतो. ह्याचे चांगले व योग्य उदाहरण बघावयाचे व वाचावयाचे असेल तर पुस्तकाना लिहिलेल्या प्रस्तावना, एकसष्टीच्या निमित्ताने आलेल्या मुलाखती व दरमाही व दरमासिकी एका कर्तृत्ववान माणसाचे चरित्र देणाऱ्या मासिकातले हे लेख वाचावेत.

अशा तऱ्हेच्या लेखातून एक वाक्य हमखास असते. ते म्हणजे 'मला जे काही यश मिळाले आहे त्याचे बहुतांशी वा सगळे श्रेय माझ्या हसतमुख व कर्तव्यपरायण पत्नीला द्यावयास हवे,' हे असते. अर्थात काही बायका खरंच हसतमुख असतील वा कर्तव्यपरायण असतील. अगदीच नाही कसे म्हणावे ? म्हणून काय सर्व लेखकाच्या, सर्व साठ वर्षे पुरी झालेल्याच्या व सर्व मासिक रतिबाच्या कर्तृत्ववान माणसाच्या सर्वच बायका हसतमुख ? प्रथम कोणा एकाने म्हटले म्हणून सर्वांनी तसे छापदेखल्या आपल्या बायकोचे असे कौतुक करावे ? फक्त पद्धत पडली आहे म्हणून ? ती तोडण्याचे धैर्य कोणातही नसावे ?

अर्थात असे पद्धत तोडण्याचे धैर्य न दाखवणेच एका दृष्टीने योग्य असते. कारण 'स्त्री ही क्षणाची पत्नी असली तरी अनंत काळची माता असते,' ह्या आचार्य अत्र्याच्या उक्तीप्रमाणे लेखक हा क्षणाचा लेखक असला तरी अनंत काळचा नवरा असतो. म्हणून क्षणिक 'लेखकपणा'च्या भावनेच्या भरात काही खरे–खुरे, म्हणजे बायकोने काहीही केलेले नाही, उलट लिहायला बसले म्हणजे 'तुमचे घरात कसे लक्ष नाही' ह्याची कुरकूर वा सासरची सगळी मंडळी कशी वाईट ह्याचीच भुणभुण लावली होती, असे लिहून आपल्या पायावर धोंडा कोण पाडून घेईल ? म्हणून सगळ्या आत्मचरित्रांतून, एकसष्टीच्या कौतुक-लेखांतून व मासिक रतिबाच्या लेखातून सगळ्याच्या बायका आपल्या हसतमुख व कर्तव्यपरायण !

पण श्यामने आपल्या मुलीच्या लग्नाबाबत जे म्हटले आहे ते तसे 'हसतमुख' चालीचे नाही. मुलीचे लग्न जमवताना लोकाना म्हणजे मुलीच्या बापाला नवेच्या नवे बाटा झिजवावे लागतात व एवढे करून सासरच्या मंडळीचा बाटा खावा लागतो व तोही जुना, ते वेगळेच ! पण श्यामच्या बाबतीत अगदी वेगळे झाले. तो पायात काही न घालता एका रविवारच्या सकाळी दिवाणखान्यात चहा पीत बसला असता त्याच्या मुलीने धडधडत्या अंत.करणाने आपण फलाण्या मुलाशी लग्न करावयाचे ठरवले आहे म्हणून सांगितले. हा फलाणा मुलगा श्याम – राघाला चांगलाच माहित होता. त्याची घरची मंडळी पण माहित होती. तेव्हा ते लग्न यथासांग व बिनबोभाट पार पडले वगैरे वगैरे. म्हणून म्हटलं ना, श्यामचे नशिब असे आहे की, ज्याचा लोकाना खूप त्रास होतो ते प्रश्न श्यामचे चुटकीसरशी सुटतात व लोकाचे जे प्रश्न चुटकीसरशी सुटतात ते श्यामचे सुटता सुटत नाहीत ! मुळात श्यामची चुटकीच वाजत नाही; माणसाचे हात ओले असले म्हणजे कशी चुटकी वाजत नाही तसे.

परदेशाला जाण्याबाबतसुद्धा श्यामचे असेच झाले. आता काय लोक परदेशाला पैशाला पासरीने जातात, म्हणजे महागाई कमी होती त्या वेळच्या पैशाने व त्या वेळच्या पासरीने. एवढेच नव्हे तर जसजशी पैशाची किंमत बदलत चालली, तसतसा परदेश वा विलायत ह्या शब्दांचा अर्थ पण बदलत चालला होता.

पूर्वी म्हणजे खूप खूप पूर्वी फक्त 'बालम' जातीचे लोकच परदेशाला जावयाचे. हे ज्यांनी नूरजहानची गाणी वा जुन्या गझली वगैरे ऐकल्या असतील त्यांना पटावे. त्यानंतर थोडेसे पूर्वी परदेशी जाणे वा Foreign–returned असणे म्हणजे इंग्लडला जाणे हेच होते. कोणी जपानला जाऊन आला तरी त्याची Foreign returned म्हणून संभावना होत नसे. इंग्लंडला जाऊन आला तोच परदेशाला जाऊन आला वा Foreign returned ! पूर्वी FRCS होण्याकरता, I.C.S. होण्याकरता व ICS जमले नाही तर बॅरिस्टर होऊन येण्याकरता म्हणून लोक परदेशाला म्हणजेच इंग्लंडला जावयाचे.

स्वातंत्र्यानंतर राजकीय पुढाऱ्यांना मिनिस्टर वगैरे होण्याची चटक लागली व त्याच्याकरता खटपटी–लटपटी सुरू झाल्या. त्याचप्रमाणे लेखकवर्गातल्या लोकांत विलायतला जाण्याची चटक लागली व त्याकरता खटपटी–लटपटी सुरू झाल्या. कोणी Ford Foundation च्या पायावर आपली परदेशगमनाची इमारत बाधत होता, तर कोणी रॉकफेलरच्या खांद्यावर बसून, जसे राम–लक्ष्मण मारुतिरायाच्या खांद्यावर बसून लंकेला पोहोचले तसे परदेशी पोहोचत होते. कोणी T. V. चा अभ्यास करण्याकरता, कोणी नाटकाचा अभ्यास करण्याकरता, कोणी कशासाठी, कोणी कशासाठी पण परदेशयात्रा पदरात पाडून घेत होता. जसे काही ह्या विषयाचा अभ्यास येथे होणे शक्यच नव्हते !

पूर्वी लोक I. C. S. करता वा FRCS करता वा बॅरिस्टर होण्याकरता म्हणून परदेशाला जात. त्याचा समाजावर फारसा परिणाम होत नसे. कारण त्या वेळी कोणीही प्रवास–वर्णन लिहीत नसे. कोणा I. C. S. वा FRCS माणसाचे प्रवासवर्णन वाचले आहेत कधी ? पण लेखकलोक परदेशाला जायला लागल्यापासून हा एक जाच समाजाला होऊ लागला. जो उठला तो परदेशाला जाऊन येऊ लागला व परत आल्यावर बसून त्यावर प्रवासवर्णनात्मक पुस्तक वा लेख लिहू लागला. त्या वेळी परदेश–प्रवास केलेले वाचक कमी असल्यामुळे ह्या लेखकवर्गाच्या बुद्धि–ताकदीपेक्षा कल्पना–ताकदीला फार वाव मिळावयाचा.

ज्या लेखकांचे परदेशाला जाण्याचे जमत नसे ते मनातल्या मनात कुढत असत. बहुसंख्य मराठी लेखक वाईचे डॉक्टर नसतानाही

देवावर व दैवावर अंधश्रद्धा न ठेवणारे असल्यामुळे त्याना ज्योतिष्याकडे जाण्याचीही लाज वाटत असे. मग चोरून–मारून कानकोंडेपणाने ज्योतिष्याला आपला हात व शंकरपाळी पत्रिका दाखवली जावयाची व मग हातात अंगठी किंवा गुरुवारचा उपास वगैरे सुरू व्हावयाचा.

पण पुढेपुढे नुसते परदेशाला जाऊन उपयोगी राहिले नव्हते. परदेश–प्रवासाची अपूर्वाई कमी झाली असली वा जवळ–जवळ संपत आली असली तरी 'अपूर्वाई'पासून प्रत्येक लेखकाने परदेशाला जाऊन आल्यावर प्रवासवर्णनात्मक पुस्तक वा लेख लिहिलाच पाहिजे, अशी जी भावना निर्माण झाली ती कायमची रुजली. एक वेळ त्यालाही हरकत नसावी; पण ते पुस्तक वा लेख पुलंसारखा विनोदप्रचुर असला पाहिजे अशीही जोड–भावना होऊन बसली, म्हणून काम कठीण झाले.

आता ज्योतिष्याला हात दाखवून वा 'वर'च्या माणसाकडून हात खेचवून घेऊन एक वेळ परदेशाला जाता येईल; पण तो झाल्यावर हातून विनोदी पुस्तक वा लेख लिहिणे होईल की नाही हे हातावरून वा शंकरपाळ्यावरून कसे सागता येणार ? मुख्य म्हणजे विनोदाचे ग्रह कधीच चागले नसतात व त्याची घरे असण्याइतके ते श्रीमंतही नसतात. मग ज्योतिषी काय सागणार कपाळ ?

म्हटलं ना अवघड गोष्ट सोपी व सोपी गोष्ट अवघड, असे श्यामचे भविष्य होते. भारत सरकार बऱ्याच देशाना पैशाची व इतर ज्ञानाची देन करते. त्याकरता विविध क्षेत्रातले लोक निवडले जातात. श्यामच्या साहेबाकडे, 'एक माणूस ओमान नावाच्या देशाला पाठवावयाचा आहे', असा खलिता आला व त्याकरता एक-दोन माणसांची नावे सुचवावीत, असेही सांगण्यात आले. ह्या साहेबाचा 'आपला' असा एक माणूस होता. घटकाभर आपण त्याला अकगणिताप्रमाणे 'अ' म्हणू या. ह्या 'अ' साहेबाचा आहे हे सर्वांस–अगदी मोठे साहेब धरून–सर्वांस माहीत होते.

आता आपण फक्त 'अ'चे नाव दिले तर बाईट दिसेल व त्याबरोबर आणखी कुणाचे दिले तर तो माणूसच परस्पर निवडला जाईल म्हणून त्यांनी 'अ' बरोबर बिनधोक श्यामचे पण नाव दिले व कागद मधल्या साहेबांकडे पाठवला. त्यांना खात्री होती की 'अ' ह्या आपल्या चमच्यातून व श्याम ह्या काटयामधून 'अ'च निवडला जाणार!

मधल्या साहेबांचा पण एक चमचा होता. त्याला आपण 'ब' म्हणू या. श्यामच्या साहेबाचे व मधल्या साहेबाचे अगदी पटत नव्हते. त्यांनी आपल्या शिफारशीत 'ब'चे नाव सुचवले व वर जर काही कारणाने 'ब' निवडला जाणार नसेल तर श्यामला निवडावे, असे सुचवले व कागद मोठ्या साहेबांकडे पाठवला. अशा रीतीने दोन चमचे व एक नाव असलेली फाइल मोठ्या साहेबांकडे गेली.

मोठ्या साहेबाना श्यामच्या साहेबामधले व मधल्या साहेबामध्ये प्रेम काय उतू चालले होते ते माहीत होते. 'अ' हा श्यामच्या साहेबाचा चमचा आहे व 'ब' हा मधल्या साहेबाचा चमचा आहे ही त्याना माहीत होते. आता 'अ' ला निवडले तर मधला साहेब नाराज होणार व 'ब' ला निवडले तर श्यामचा साहेब नाराज होणार. दोघानी श्यामचे नाव सुचवले होते, त्याना स्वत.चा कोणीही चमचा परदेशाला पाठवावयाचा नव्हता मग उगाच साहेबद्वयाना कशाला दु.खी करा, म्हणून त्यानी 'अ' ही नको 'ब' ही नको म्हणून 'क' ला म्हणजे श्यामला मंजूर करून टाकले व काही दिवसांनी श्यामला तसे पत्र मिळाले.

प्रथम ते पत्र पाहून व मजकूर वाचूनसुद्धा श्यामचा त्यावर विश्वास बसला नाही. ही ही बहुधा टंकनीय चूक असावी असा त्याने अंदाज केला. तेवढ्यात त्याला एका चतुर्थ श्रेणी सहकाऱ्याने–ज्याना पूर्वी पिऊन वा चपरासी वा शिपाई म्हणत, त्याने येऊन सांगितले की, साहेब तुम्हाला तातडीने बोलावताहेत म्हणून. तो साहेबाकडे जाताच साहेबानी उठून त्याचे अभिनंदन केले व मीच तुमचे नाव कसे दिले, मधल्या साहेबाना 'ब'-लाच कसे पाठवावयाचे होते ते सांगितले. ते पुढे म्हणाले, 'मी मोठ्या साहेबांना स्पष्ट सांगितले. हा माणूस साधा व सरळ आहे. त्याला त्याच्या साधेपणाचे व सरळपणाचे फळ मिळालेच पाहिजे,' वगैरे वगैरे व जाता जाता आता तुम्ही परदेशात जाता आहात तर भारताचे नाव उज्ज्वल करा, असाही त्यांनी सल्ला दिला.

श्याम परत येऊन खुर्चीवर बसतो न बसतो तोच मधल्या साहेबाचा 'चतुर्थ–श्रेणी' साहेबांनी तातडीने बोलावले आहे म्हणून त्याला सांगायला आला. मधल्या साहेबाकडे परत तोच कार्यक्रम झाला. 'त्या तुझ्या साहेबाला त्या ह्याच्या 'अ' चमच्याला पाठवावयाचे होते. पण मी मोठ्या साहेबांना स्पष्ट म्हणालो की, हा सरळ व साधा माणूस आहे व त्याला साधेपणाचे व सरळपणाचे फळ मिळालेच पाहिजे'. साहेब तावातावाने सांगत होते. त्यानी 'ब' निवडला जाणार नसेल तर श्यामला निवडावे असे म्हटले होते. त्यामुळे त्यांना जोराने बोलण्याचा अधिकार होता. ह्याही साहेबांनी, आता परदेशात जाता आहात तर भारताचे नाव उज्ज्वल करा, म्हणून सदेश दिला. खोलीबाहेर येता येता श्याम मनाशी म्हणाला की, आपले नशीब थोर म्हणून आपल्याला दोन्ही साहेब स्पष्ट बोलणारे मिळाले. व दोघानाही सरळ व साध्या माणसाला, त्याच्या सरळ व साधेपणाचे फळ मिळावे अशी इच्छा होती. साहेबांच्या खोलीपासून आपल्या खुर्चीपर्यंत येईयेईतो, तो विचार करू लागला की भारताचे नाव उज्ज्वल करावयाचे म्हणजे नक्की काय करावयाचे ?

त्या दोन विरुद्ध दिशाच्या साहेबानी त्याचे अभिनंदन केल्यावर व त्याला भारताचे नाव उज्ज्वल करायला सागितल्यावर त्याने सकाळचे हुकुम–पत्र परत वाचले. आता त्यावर त्याचा विश्वास बसला. आपण परदेशात जाणार ह्याची त्याला खात्री पटली व त्याचा आनंद गगनात मावेनासा झाला.

परदेशाला जाण्याकरता लोकाना मिनिस्टराच्या वा ज्योतिष्याच्या घराच्या पायऱ्या चढायला लागतात वा उपासतापास करायला लागतात वा हातात आगठ्या घालायला लागतात. श्यामला फक्त त्याच्या सरळपणामुळे व साधेपणामुळे परदेशाला जायला मिळणार होते. तेथे दोन–तीन वर्षे रहायला मिळणार होते व थोडा पैसा गाठी बाधता येणार होता.

एवढे होईपर्यंत श्यामच्या कचेरीतल्या सहकाऱ्यानाही त्याला परदेशाला पाठवणार आहेत ही बातमी कळली. आता 'अ' आणि

'ब' एक झाले होते व त्यांनी श्यामच कसा दोन्ही साहेबांचा चमचा आहे हे लोकांना सांगावयास सुरवात केली. त्याचे एकच म्हणणे होते, 'आता तुम्हीच सागा दोघांचा चमचा असल्याशिवाय अशा साध्या व सरळ माणसाला कोणी परदेशाला पाठवेल का?' अर्थात् त्यांच्या हिशेबी साधा व सरळ ह्या शब्दाचा अर्थ आपण घेतो तसा साधा व सरळ नव्हता. श्यामचे बाकी सहकारी 'अ' गेला काय, 'ब' गेला काय वा 'क' गेला काय, ह्याने काय फरक पडतो असे मनाशी म्हणत श्यामकडून मिळालेल्या भजी-चहावर ताव मारत होते व हे फार छान झाले बुवा व परदेशाला गेल्यावर आम्हाला विसरू नका, म्हणून श्यामला हरबऱ्याच्या झाडावर चढवत होती.

¤

आता केव्हा एकदा घरी जाऊन राधाला व मुलाना ही बातमी सांगतो असे श्यामला झाले. कारण बायको व मुलेच आपले निर्मळ कौतुक करतील ह्याची त्याला खात्री होती. तेव्हा तो मोठया लगबगीने घरी गेला व जवळजवळ ओरडतच म्हणाला, 'राधा, ए, राधा! अग, मला सरकार बघ परदेशाला पाठवत आहे. कोणता तरी ओमान नावाचा देश आहे व मस्कत नावाची राजधानी आहे, वा मस्कत नावाचा देश आहे व ओमान नावाची राजधानी आहे. चांगले तीन वर्षां-करता! लवकर बाहेर ये!'

ज्या वेळी नवऱ्याला एखाद्या गोष्टीची घाई झालेली असते त्या वेळी बायका अगदी शांत असतात. ह्या नियमाला अनुसरून राधा शातपणे पातळाला हात पुसत बाहेर आली व तिने शांतपणे श्यामच्या हातून तो हुकुमाचा कागद घेतला व तेवढयाच शांतपणे ती तो वाचू लागली. अर्जुनाला जसं झाड वगैरे काही न दिसता फक्त पक्ष्याचा डोळा दिसला होता त्याप्रमाणे राधाला ह्या हुकुमातला फक्त पगाराचा आकडा दिसला व जाणवला होता.

'O. R. म्हणजे काय हो?' राधा–शांत-पणा–प्रश्न.

'अग O. R. म्हणजे Oman Rials म्हणजे त्या देशाचे चलन.'

'ते ठीक आहे हो, पण एक O. R. म्हणजे किती रुपये?'

श्यामने साधारण २५ रुपये म्हणजे एक O. R. असे सांगितले.

'मग आपल्याला पगार किती मिळ-णार?' राधाचा–शांतपणा–प्रश्न.

श्यामने कचेरीत हिशेब केला होताच. त्याने फटक्यात पाच आकडी पगाराचा भर-घोस आकडा सांगितला.

तो पगाराचा आकडा ऐकताच राधाचा एकदम कायापालट म्हणतात तसा झाला. आधीच गोरी असलेली राधा पाच आकडी पगाराने चमकू लागली व जवळजवळ श्यामच्या आवाजात ओरडत म्हणाली, 'अय्या, इतका सारा पगार?'

राधाला आणखी आनंदवण्याच्या दृष्टीने श्याम म्हणाला, 'अग, हा नुसता पगार, वर Income Tax नाही, पहिल्या वर्गाचे प्रवास-पत्र, वर घरात फर्निचर फुकट, वीज–पाणी फुकट, वापरायला गाडी फुकट, त्याला लागणारे पेट्रोल फुकट...'

जसजशी फुकट-फुकटची यादी वाढू


## ZENITH STEEL PIPES & INDUSTRIES LTD.

*Makers of finest quality* :

- STEEL PIPES
- ROLLS & SHEARS
- SPECIAL STEELS
- CHEMICALS

A REPUTATION BASED ON COMMITMENT TO QUALITY.

**Regd. Office** : Moti Mahal
195, Churchgate Reclamation
Bombay 400 020
Tel 221122
Telex 011-2458 & 011-6334

लागली तस-तशी राधा आनदाच्या सागरात डुंबू लागली. पाच आकडी पगारापेक्षा श्यामला इतक्या सगळ्या गोष्टी फुकट मिळणार आहेत हे बघून तिचा श्यामबद्दलचा आदर नुसता द्विगुणितच नव्हे तर १ दिवसाला २५ रुपये ह्या हिशेबाने गुणित झाला व कधी नव्हे ते राधाने श्यामला किसले!

पण बायका आनंदसागरात जास्त वेळ डुबत रहात नाहीत. राधा पण आनंदसागरातून तातडीने वर आली व कपडे वगैरे बदलून श्यामला गंभीरपणे म्हणाली, 'ते सगळे ठीक आहे; पण एक काम मात्र नक्की करावयाचे बघा! आता तुम्ही ओमान का कुठे जाता आहात तर त्यावर एक छान विनोदी पुस्तक, निदान चांगले तीन-चार लेख व तेही अगदी विनोदी लिहिण्याचे कबूल करा!'

राधाने कधी नव्हत त्या आपणहून किसण्याचा श्यामवर अजून परिणाम राहिला होता. आता त्याची आनदसागरात डुबावयाची पाळी होती. राधाने किसल्याने त्याला इंग्रजी सिनेमातल्या उंच नटासारखे वाटत होते. त्या मूडमध्येच तो म्हणाला, 'हो, हो! त्यात काय विशेष? दोन-चार लेखच का, चांगले भक्कम पुस्तक लिहीन व अगदी तू म्हणतेस तसे विनोदी!' ह्या आश्वासनाने राधाला आणखी डझनभर गोष्टी फुकट मिळाल्याचा आनंद झाला. राधानं त्या फुकटच्या आनंदात श्यामला परत एकदा फुकट किसले व त्याच्या प्रवासवर्णन लिहिण्याच्या आश्वासनावर शिक्का-मोर्तब केले मराठीत मोठ्या प्रमाणात प्रवासवर्णनं लिहिली जातात त्याचे हे एक कारण नसेल ना? श्यामच्या मनात गाल पुसता पुसता विचार आला.

राधा श्यामच्या मागे प्रवासवर्णनात्मक विनोदी पुस्तक, निदान दोन-चार लेख तरी लिहिण्याचा इतका अट्टाहास करत होती त्याला थोडे कारण होते. राधा नवरा कसा असावा असे विचार करण्याच्या वयोगटात होती त्या वेळी महाराष्ट्रात 'अमलदारा'ने धुडगूस घालून झाला होता. 'नसत्या उठाठेवी' चालू होत्या. 'खोगीरभरती' होत होती. थोडक्यात म्हणजे, पुल लोकाच्या आदराचा व कौतुकाचा विषय बनले होते. महाराष्ट्राला किती वर्षातच का प्रथमच, तेल्या-तांबोळ्यांचा विनोदी लेखक मिळाला होता. राधा त्या वेळी कोणत्या वयावस्थेत होती हे वर सांगितले आहेच. आपल्याला पुलंसारखा नवरा असावा असे तिच्या मनाने घेतले. अशा माणसाचे लिखाण इतके विनोदी तर त्याच्याबरोबरचे जीवन किती तरी विनोदी होईल, असा भोळा विचार तिने केला होता.

थोडक्यात उर्दू शायरीमध्ये ज्याला जिगर म्हणतात तसा पुलंच्या जिगरीचा नवरा तिला हवा होता. आता पुलंसारखी 'जिगर' असलेले लोक थोडे; पण 'फिगर' असलेले लोक भरपूर होते. श्याम तर हवा त्या वर्णनात अगदी चपखल बसत होता. राधाने श्यामच्या स्थळाला होकार देण्यात श्यामचे दिसण्यातले 'पुलपण' हे महत्त्वाचे कारण होते. अर्थात लग्नानंतर जग दिसते तसे नसते ह्या म्हणीवर तिचा विश्वास बसू लागला. जर पुलंसारखे दिसणारे सगळे लोक त्याच्यासारखेच विनोदी लेखक झाले असते तर आज महाराष्ट्र महाराष्ट्र न रहाता महा-विनोदी राष्ट्र झाला असता!

पण म्हणून राधाने आपला प्रयत्न सोडला नव्हता. श्यामच्या मागे ती नेहमी काही तरी लिहा-गोष्टी लिहा-विनोदी लेख लिहा असे टुमणे लावत असे. अर्थात विनोदी परदेशप्रवासवर्णनात्मक पुस्तक वा लेख लिहिण्याचे टुमणे तिने कधी लावले नाही कारण श्यामच्या एकंदर बोलण्या-चालण्यावरून तो परदेशी कधी पाठवला जाईल असे तिला वाटले नव्हते. त्यामुळे ,श्याम परदेशाला जाणार, त्याला पाच आकडी पगार मिळणार. हे फुकट, ते फुकट मिळणार ह्या आनंदाबरोबरच आता आपला नवरा विनोदी प्रवासवर्णनाचा लेखक होणार ह्याचा तिला जास्त आनंद झाला होता. म्हणूनच इतकी फुकट किसे व श्यामकडून लगेच दशरथासारखे वचन.

¤

श्याम सरकारी कामगिरीवर जाणार असल्यामुळे पासपोर्ट मिळवणे, त्याकरता वेगळ्या वेगळ्या ठिकाणी खेटे घालणे वगैरे भानगडी त्याला करावयाच्या नव्हत्या. तो ह्या सर्व कटकटीपासून वाचला असला तरी त्यामुळे त्याच्या नियोजित पुस्तकातल्या एका चविष्ट प्रकरणाला मुकला होता.अशा पासपोर्ट मिळण्यात त्रास कसा होतो वगैरे वर्णन करण्यात दोन तऱ्हेचे फायदे असतात; एक फायदा स्पष्ट आहे. तो म्हणजे लेखाला माल-मसाला मिळतो व दुसरे सरकारवर व सरकारी काम करणाऱ्यावर उगाचच ताशेरे ओढून वाचकवर्गाला आनंदी करून सोडता येते. खरे म्हणजे पासपोर्ट कचेरीतले वा इतर सरकारी कचेरीतले लोक जसे हलगर्जी असतात तसेच त्या हकीकती चविष्टपणाने लिहिणारा लेखक व तेवढ्याच चविष्टपणे वाचणारा वाचकही हलगर्जी व कामचुकार असतो; पण लेखक परस्पर सरकारी नोकरावर ताशेरे झोडतो आहे हे वाचून वाचकाला उगाचच आनंद होत असतो. असो. सांगावयाचे तात्पर्य काय की, ज्याचा सर्व लोकांना खूप त्रास होतो ते पासपोर्ट मिळण्याचे श्यामचे काम विनासायास झाले होते व तो एका चविष्ट प्रकरणाला मुकला होता.

त्याचप्रमाणे सुट शिवण्याविषयी. श्याम दिल्ली वगैरेसारख्या कधी गर्मीच्या वा कधी थंडीच्या गावी राहिला असल्यामुळे त्याच्याकडे तीन-चार सुटस् होते. त्यामुळे सुट शिवण्याबाबत जो मराठी लेखकाचा जीव खाली-वर होत असतो व सूट ह्या शब्दावर पन् (PUN) करावयाचा असा पण करून, जे आपला लेख साजरा करत असतात, त्यातून श्यामची सुटका होणार होती. म्हणजे श्यामने तसा प्रयत्न केला नाही असे नाही. 'सुटलो', 'सुट'-सुटीतपणा वगैरे वेगवेगळे शब्द त्याने डोळ्यासमोर आणून पाहिले; पण त्यातला कोणताही विनोद 'सूट' होईना व त्याच्यावर विनोदनिर्मिती करता येईना. तेव्हा श्यामने मोठ्या नाइलाजाने 'सूट' प्रकरणावर पडदा टाकला व त्या प्रकरणातून स्वतःची, शिंपीवर्गाची व वाचकाची सुटका केली. येथल्या 'सुट'केचा श्यामच्या सुटाशी काहीही सबंध नाही हे स्पष्ट केले पाहिजे, नाही तर वाचक विनोद झाला आहे असे समजावयाचे व हसावयाचे!

श्यामने त्या आपल्या दोन-चार सुटाबाबत परदेशाला जातो आहोत म्हणून एवढेच केले की, नेहमीप्रमाणे आपले सूट रॉयल ड्रायक्लिनिंग वर्क्समध्ये धुवायला न देता उच्चार करायला खूप अवघड व तेवढेच अवघड पैसे घेणाऱ्या लॉन्ड्रीमध्ये टाकले होते. त्याच वेळी राधा त्याला परत परत सांगत होती की, सुट येथे धुवायला टाकू नका. तेथे गेल्यावर परत धुवायला लागतील, निदान 'प्रेस' करायला लागतील. परदेशाला जाण्याकरता

निवड झाली असल्याकारणाने श्यामच्या मनात आता उच्च वर्णीय मनोवृत्ती निर्माण झाली होती. तो 'चल, चल, तसे कसे करून चालेल,' असे म्हणाला होता; मस्कतला गेल्यावर मात्र बायका परदेशाला न जाताही तेथे काय असेल ह्याचा अंदाज बरोबर करतात ह्याविषयी त्याची खात्री पटली; पण उशिरा!

त्या दृष्टीने पाहिले तर गुजराथी म्हणी-प्रमाणे प्रत्येक नवरा ब्राह्मण असतो व बायको वाणी असते. येथे ब्राह्मण व वाणी हे जातिवाचक शब्द नाहीत. हे वृत्ति-वाचक आहेत. गुजराथीत 'आगळ बुद्धी वाणिया—पाछल बुद्धी बामणिया' अशी म्हण आहे. ह्याचा अर्थ, काही होण्याआधी वाण्याला अक्कल सुचते व सर्व काही झाल्यावर ब्राह्म-णाला! राधा येथे सूट धुऊ नका म्हणत होती; पण श्यामने तिचे ऐकले नव्हते. मस्कताला पोहोचल्यावर राधाचे म्हणणे ऐकले असते तर...पण आता काय उपयोग? नवरा ब्राह्मण व बायको वाणी! असो.

¤

त्या वेळी श्यामसमोर कपड्यांबाबत प्रश्न नसून ओमान हा देश आहे व मस्कत ही राज-धानी आहे वा मस्कत हा देश असून ओमान ही राजधानी आहे ही माहिती मिळवण्याचा होता व तो एकदा सुटला की मग तेथले हवामान काय, भाषा कोणती, मुख्य म्हणजे तो कोठे आहे, तेथे रहाणीमान कसे आहे, बाजारात काय काय मिळते वा मिळत नाही वगैरे प्रश्न पण सोडवावयाचे होते. प्रथम प्रश्न ओमान वा मस्कत आहे कुठे?

आता गल्फ भागात शेकड्याने लोक जातात. पूर्वी लोक नाशिक, धुळे, मनमाड, भुसावळपर्यंत जातात. त्यानंतर दिल्ली, कलकत्ता, अलाहाबाद आवाक्यात आले. मग लंडन, लिड्स्, ग्लासगो, एडनबरो वगैरे नावे सरावाची झाली. त्यानंतर न्यूयॉर्क, वॉशिं-टन्, सानफ्रान्सिसको वगैरे गावे जळगाव-भुसावळसारखी वाटू लागली. आता गेल्या सात-आठ वर्षांत दुबई, कुवेट, बहारिन, मस्कत वगैरे गावे अगदी अंधेरी—विलेपारल्यागत लोकल वाटू लागली, पण एवढे होऊन सुद्धा मस्कत वा ओमान कोठे आहे असे विचार-ल्यावर कोणालाही नक्की सागता येईना. मस्कती डाळिंबाबद्दल सगळ्याचे ऐकले होते व सगळेजण 'अरे तेथेच, दुबाई, कुवेट, बहारीन वगैरे सर्व शहरे जवळजवळ आहेत', एवढेच सांगत. सगळ्याचे आपले अंदाज.

भूगोल हा विषय फक्त विसरण्याकरताच शिकवतात की काय? कारण भूगोतले फक्त भू गोल आहे म्हणजे पृथ्वी गोल आहे, एवढेच लोकांच्या लक्षात असते. सग-ळ्यांचा भूगोल हा विषय किती कच्चा असतो हे पहावयाचे असेल तर कोणालाही विचारा की, आशिया खंडाची राजधानी कोणती आहे म्हणून. सगळेजण प्रथम बाव-चवळतील व काही लक्षात नाही बुवा, कधी काही वाचले होते पण आता आठवत नाही बुवा वा बाई, असं छातीठोकपणे म्हणतील आशिया हा खंड आहे व खंडाला राजधानी नसते म्हणून एकही जण सागणार नाही.

मग एकदा श्यामने कचेरीतल्या लोकांना मस्कत वा ओमान कोठे आहे म्हणून विचा-रले. आता कचेरीतल्या लोकाचाही भूगोल कच्चाच की! त्यानीसुद्धा ओमान, मस्कत, दुबई, कुवेट, बहारिन वगैरे गावे जवळ-जवळच आहेत म्हणून सांगितले. त्यातल्या एकाने, 'अरे श्याम, मस्कत वा ओमान म्हणजे काय गायआळी वा शनीचा पार आहे का, विचारत विचारत जायला? तुला माहीत नसेल ओमान कोठे आहे म्हणून; पण त्या विमानचालकाला तर माहित अस-णारच ना? तू आपला ओमानच्या विमा-नात जाऊन बस. तो बरोबर नेईल!' असे सागून सर्व सहकाऱ्यात हशा पिकवला होता. श्यामला ह्या खडूस बोलण्याचा राग आला होता; पण पाच आकडी पगाराच्या गुलाबा-बरोबर असे खडूस बोलण्याचे काटे सहन करावे लागणारच, असे त्याने मनाचे समा-धान करून घेतले.

मग त्यातल्या त्यात सज्जन असलेल्या एका सहकाऱ्याने, श्यामला अमेरिकन-इन्फर्मेशन् सेन्टरमध्ये जा म्हणजे माहिती मिळेल, असे सागितले. 'म्हणजे ओमान का मस्कत का काय ते अमेरिकेत आहे की काय?' श्यामचा भाबडा प्रश्न. त्या सज्जन माणसाने आपला राग ढळू न देता सांगितले की, ओमान अमेरिकेत नाही; पण अमेरिकेला सर्व जगात उचापती करावयाच्या असतात. म्हणून ते सर्व जगाची माहिती ठेवतात. तेथे सर्व माहिती आनदाने देतात. हे कळल्यावर श्यामला खूप आनंद झाला व तो मोठ्या आनंदात अमेरिकन सेंटरवर गेला.

पण तेथे जाताच त्याच्या आनंदाला ओहोटी लागली. तेथे माहिती देण्याच्या कट्ट्यावर एक किनऱ्या आवाजात बोलणारी म्हटलं तर युवती, म्हटलं तर बाई बॉबकट केलेली पारशीण बसली होती. इतके वय झाले तरी अजून काही चौकशी करावयाची म्हणजे श्यामची छाती धडधडते, जीभ कोरडी पडते व शब्द उलटसुलट होतात. आता येथे प्रथम अमेरिकन सेंटर म्हणजे इंग्रजीत विचारावे लागणार, त्यातून बॉब-कट, त्यातून पार्शी, त्यातून बाई! श्यामच्या धडधडण्याला काय सीमा!

'कुठे आहे ओमान—मला म्हणायचे होते—मस्कत?' श्यामने धडधडत्या अंतःकरणाने विचारले.

'काय तुम्हाला पाहिजे?' त्या पार्शी युवती—कम—बाईने किनऱ्या आवाजात विचारले. 'ओमान की मस्कत?'

'मला पाहिजेत दोन्ही.' श्यामने धीर करून दुसरे वाक्य म्हटले. त्या पार्शी बाईला दिवसातून निदान दोन—चार श्यामना तरी माहिती द्यावी लागत असल्याकारणाने तिला असल्या श्यामपणाची चांगली सवय होती असे वाटते. ती म्हणाली, 'कृपा कर व थांब!' श्यामने कृपा केली व तो थांबला. तिने बाजूच्या फडताळातून भला मोठा जगाची माहिती देणारा कोष काढला. त्यातून ओमान व मस्कत शोधून काढले व मस्कत ही राज-धानी आहे व ओमान हे देशाचे नाव आहे वगैरे सागून तेथले हवामान, भाषा, लोक-संख्या, तेथील राज्यपद्धतीची सर्व माहिती त्याला दिली. तेव्हा श्याम मोठ्या आनदात 'आभारी तुमचा—आभारी तुमचा,' म्हणाला. त्यावर ती परत किनऱ्या आवाजात 'तुमचे नेहमीच स्वागत होईल,' म्हणाली. हा सर्व सवाद इग्रजीतून झाला होता; पण बाळा-साहेब खेराच्या विद्यार्थ्यांना कळावा म्हणून मराठीत शब्दशः भाषातर करून दिला आहे. अमेरिकन सेंटरच्या बाहेर पडता पडता श्याम मनाशी म्हणाला, 'अच्छा, अमेरिकेत 'आभारी तुमचा' म्हटल्यावर 'तुमचे नेहमीच स्वागत होईल' म्हणतात काय?'

हे श्यामने इतके बारिकपणे नोंद करण्याचे कारण म्हणजे, त्याला आपल्या प्रवास—वर्ण-

नाच्या पुस्तकाकरता माहिती गोळा करावयाची होती. त्यामुळे मधमाशी ज्याप्रमाणे मधाचा एक एक कण गोळा करते तसा तो करू लागला होता. आज गोळा झाला तेवढा मध खूप झाला असा विचार करून तो तडक घरी आला.

¤

काही दिवसानी त्याला व्हिसा देणारे पत्र आले. गल्फ एअरच्या कचेरीत जाऊन आपली पहिल्या वर्गाची प्रवास–पत्रिका घ्यावी, असे सुचविणारे पण पत्र आले. आतापर्यंत त्याने वाचलेल्या कोणाही विनोदी वा अ–विनोदी प्रवासवर्णनात कोणी मराठी लेखकाने पहिल्या वर्गाने विमानाचा प्रवास केल्याचे वाचले नव्हते. म्हणजे पहिल्या वर्गाने प्रवास करणारे आपण पहिलेच मराठी लेखक, असे श्यामच्या मनात आले. आपल्या वर्णनात सर्व लेखकावर कुरघोडी करणारा हा मुद्दा घालावा का, असाही त्याच्या मनात प्रश्न आला; पण आपण मध्यवर्ती सरकारातल्या नोकरीकरता बरीच वर्षं महाराष्ट्राबाहेर राहिलो होतो. त्या वेळी एखादा बार्रिक–सारिक लेखक गेला असेलपहिल्या वर्गाने, कुणी सागावे ? म्हणून त्याने कुरघोडी करण्याची कल्पना सोडून दिली.

आता पहिल्या वर्गाच्या पॅसेंजराना–हो पॅसेंजरानाच–कारण विमानाच्या प्रवाश्याना काय म्हणतात ते त्याला माहीत नव्हते व त्याला कोणी सागितले पण नव्हते व त्याने कुठे त्याबद्दल वाचलेही नव्हते. बालपणापासून त्याला प्रवासी ह्या शब्दाला पॅसेंजर हाच शब्द माहीत होता. पुढे तो मेलने वा एक्सप्रेसने जाऊ लागला, वळप्रसगी तो विमानाने पण जाऊ लागला होता. आता तर काय पहिल्या वर्गाने जाणार होता, तरी त्याच्या हिशेबी कोणीही प्रवासी म्हणजे पॅसेंजरच होता. तर पहिल्या वर्गाच्या पॅसेंजरांना काय काय सवलती असतात, हा मध त्याला गोळा करावयाचा होता.

तसा त्याचा एक मेव्हणा एका खाजगी कंपनीत असल्याने नेहमी पहिल्या वर्गाने जावयाचा. त्यामुळे बहिणीकडून पहिल्या वर्गाच्या पॅसेंजराना हे फुकट मिळते, ते फुकट *मिळते वगैरे माहितीचा मध श्यामला मिळाला* होता; पण तो त्याच्या बहिणीने वाटलीतून भरून दिला असल्याकारणाने खादी भाडारात मिळतो त्या मधाएवढा विश्वासपात्र नव्हता. तेव्हा विमानकंपनीत जाऊन तो माहिती–मध गोळा करावा, असे श्यामच्या मनाने घेतले.

त्या कल्पनेप्रमाणे तो एअर इडियाच्या आकाशाला भिडणाऱ्या इमारतीच्या तळमजल्याशी असणाऱ्या गल्फ एअरच्या कचेरीत गेला व तेथल्या दार-रक्षकाला त्याने त्याला आलेले पत्र दाखवले. त्या द्वाररक्षकाने कोपऱ्यातल्या एका कट्ट्याकडे बोट केले *त्या कट्ट्यावर तीन-चार चुणचुणीत युनिफॉर्म* घातलेल्या मुली व बाजूच्या बाकावर बरेचसे काळे, गोरे, निमगोरे, दाढीवाले, निमदाढीवाले व बिनदाढीवाले बसले होते.त्या विविध रंगाच्या व दाढ्यांच्या गर्दीकडे पाहून श्याम म्हणाला की, मध गोळा करण्यात चांगले दोन-चार तास तरी जाणार म्हणावयाचे !

मग त्यातल्या त्यात ती जास्त चुणचुणीत मुलगी होती, बहुधा ती गुजराथी असावी, तिच्याकडे तो गेला व त्याला आलेले पत्र तिला दाखवले. तो पहिल्या वर्गाचा पॅसेंजर आहे हे बघताच ती मुलगी त्याला 'बस्तान मांडा, महाराज', असे मोठ्या आदराने म्हणाली. बाकी पहिल्या वर्गाचा काही फायदा असो की नसो, त्याना रांगेत उभे रहायला म्हणजे बसायला लागत नाही हे काय कमी झाले ? असा विचार श्यामच्या मनात आला.

मग त्याने विमानाने जाण्याचे दिवस कोण कोणते आहेत, त्याच्या वेळा कोणकोणत्या आहेत ही माहिती काढून घेतली. राधाने त्याला शक्यतो रविवारी वा शनिवारचे पक्के करा म्हणून सागितले होते. शनिवारचे विमान सकाळी चार वाजताचे होते व आंतरराष्ट्रीय विमान सेवानियमाप्रमाणे दोन तास आधी जाऊन 'आम्ही आलो आहोत' हे सागणे आवश्यक होते. म्हणजे रात्रीच्या दोन वाजता ! आता दोन वाजता कसे पक्के करकरणार ? म्हणून श्यामने शनिवारचा नाद सोडला. त्या मानाने रविवारची विमान–वेळ खूप सोयीची होती. म्हणजे संध्याकाळी साडेसात वाजताची होती.

तो मनाशी म्हणाला, काय ह्या विमानसेवेची अक्कल ! एक सेवा सकाळी चार वाजता तर दुसरी संध्याकाळी ७॥ वाजता ! ह्याना ११–१२ वा ४–५ असा वेळ कसा सुचला नाही! मग त्याच्या लक्षात आले की, प्रत्येक गावाचे लोक जर अशी सोईची वेळ मागू लागले तर विमान-सेवा चालवणे अशक्य होईल. थोडक्यात त्याने रविवारचा दिवस पक्का केला व ७॥ ची वेळ पक्की केली. ते विमान मस्कतला ओमान वेळेप्रमाणे ८॥ वाजता पोहोचणार होते. ओमान वेळ हिंदुस्थानपेक्षा दीड तासाने मागे आहे, ही माहितीही श्यामने चलाखीने काढून घेतली. कारण अशा गोष्टीचा प्रवासवर्णनात खूप उपयोग करतात हे त्याने पाहून ठेवले होते. रविवार असल्याने मुलाची कॉलेजेस बुडणार नव्हती व निरोप द्यायला मित्रमंडळी घरी वा विमानतळावर येवू शकणार होती. हे रविवार पक्का करण्याचे दुय्यम फायदे होते.

श्यामच्या मोठ्या बहिणीने पहिल्या वर्गाच्या पॅसेंजरना पायात घालावयाचे मोजे, उजेडाचा त्रास होऊ नये म्हणून डोळ्याला लावावयाची पट्टी वगैरे गोष्टी फुकट मिळतात हे सागितले होते. त्या गोष्टी खरंच फुकट मिळतात का व त्याशिवाय आणखी काय काय फुकट मिळते हे त्या कट्ट्यावरच्या चुणचुणीत गुजराथी मुलीला कसे विचारावे असा त्याला प्रश्न पडला.असा प्रश्न पडण्याचे कारण असे की, जर सरळ जाऊन विचारले की,' का ग बाई, पहिल्या वर्गाच्या पॅसेंजरना काय काय सवलती मिळतात', तर तिच्या ताबडतोब लक्षात येईल की, हा पहिल्या वर्गाने प्रथमच जातो आहे म्हणून. ते तर तिच्या लक्षात येऊ देणे शहाणपणाचे नव्हते.

तेव्हा त्याने मोठ्या नाना फडणविशी पद्धतीने विचारले, 'तुमची विमान–सेवा बाकी विमानसेवेपेक्षा काय काय जास्तीच्या सवलती देते ?' ती चुणचुणीत नानापेक्षा वस्ताद निघाली. ती म्हणाली, 'बाकी सेवा ज्या सवलती देतात त्याच आम्ही पण देतो.' आता काय करावे असा श्यामला प्रश्न पडला पण तो त्या मुलीनेच सोडविला. ती पुढे म्हणाली, 'तुम्हाला ३० किलोग्रॅम वजन नेता येईल, एक हवाई-पिशवी मिळेल व उड्डाणात पाहिजे ते पेय प्यायला मिळेल !' श्यामने निश्वास टाकला व तो घरी आला.

¤

व्हिसा झाला, प्रवास-पत्रिका झाली, आता जाण्याकरता खरेदी काय काय करावयाची ह्याचा खल सुरू झाला. राधा प्रथमपासून

त्याला म्हणत होती की, येथे काहीही खरेदी करू नका. तेथे चांगल्या आयात-गोष्टी मिळतील. तेथे चामड्याचे सामान फार महाग असते, तेव्हा बुटांचे मात्र चांगले तीन-चार जोड घेऊन जा, असा कोणी एकच बूट काढला. कोणी म्हणाले की, तेथे औषधे फार महाग असतात तेव्हा औषधांचा भरपूर साठा घेऊन जावा. ह्यावर सगळ्यांचे एकमत झाले असले तरी कोणती औषधे न्यावीत ह्यावर एकमत होईना. दुर्दैवाने श्यामला कोणतीही व्याधी नसल्याने कोणा एका प्रकारची औषधे नेऊन उपयोगी नव्हती. मग डॉक्टरकडून तपासणी करून काय काय व्याधी होण्याची शक्यता आहे ती पडताळून घ्यावी, येथपर्यंत लोकांच्या सूचनांची मजल गेली. शेवटी राधाने निर्णय करून अमृतांजनची बाटली, अॅनासिनचे पाकिट व अिन्डोबायोफार्म वा त्यासम दुसरे औषध बरोबर देण्याचा निर्णय घेतला.

मस्कतला गेल्याबरोबर हॉटेलमध्ये काही दिवस मुक्काम होणार असला व त्यापुढे जेवण-खाण बनवण्याकरता काही सामान नेण्याची गरज नसली तरी गेल्यावर चागले इस्त्री केलेले कपडे पाहिजेत, तेव्हा एखादी इस्त्री बरोबर असू द्यावी. त्याचप्रमाणे करमणुकीकरता एखादा छोटासा ट्रॅन्झिस्टर न्यावा, असेही ठरले.

प्रथम प्रथम ही चर्चा स्वत' श्याम, राधा दोन्ही मुलं व माहेरी असली तर मुलगी ह्या सगळ्यात होत असे. त्याच्या घरी पूर्वीपासून ही लोकशाही पद्धत होती. मुलं लहान व अज्ञान होती तोपर्यंत लोकशाहीतला धोका श्यामच्या ध्यानात आला नव्हता; पण आता मुलं कॉलेजला जाऊ लागली होती. त्याना आता मतं फुटली होती. श्याम-राधाची हरकत नव्हती; पण आता आई-वडिलांची मते नुसतीच जुन्या पद्धतीची आहेत असे त्याना वाटत नसे, तर ती मते टाकाऊ आहेत असेही त्याना वाटू लागले होते. त्यामुळे आता तशी चर्चा मुलं कॉलेजात गेली हो राधा-श्याम आपसात करू लागले व त्याप्रमाणे सामानाची खरेदी होऊ लागली.

राधाच्या सर्वांगीण प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेण्याकरता म्हणून त्यानी वजनाचा काटा विकत घेतला होता. श्यामला परवानगी होती त्यापेक्षा चार-पाच किलोग्रॅम वजन जास्त होत होते; पण तेवढे पहिल्या वर्गाच्या पॅसेंजरला दडवता येईल असे सर्वांचे मत पडले.

¤

परदेशाला दोन-तीन वर्षांकरता जाणार म्हणजे सर्व नातेवाईकांकडे व मित्रमंडळीकडे जाणे आवश्यक होते. ह्यात दोन-तीन पक्षी मारता येणार होते. पक्षी पहिला, त्याच्या गैरहजेरीत राधाला काही मदत लागल्यास त्याबद्दल सूतोवाच करून ठेवावे. पक्षी दुसरा, परदेशाला जातो आहे त्याबद्दल कौतुक करून घ्यावे. पक्षी तिसरा, पगार व फुकट मिळणाऱ्या गोष्टींची यादी देऊन त्याना मत्सरावता आले तर पहावे.

प्रथम श्याम व राधा त्याच्या मोठ्या बहिणीकडे गेले. ह्याच बहिणीचे यजमान पहिल्या वर्गाने प्रवास करत असत. श्याम व राधा जाऊन बसले न बसले तोच त्याच्या बहिणीने काही मुलाहिजा न ठेवता, 'एवढा बाहेर जातो आहेस; पण पगार चांगला मिळणार आहे का ?' असे विचारले. इंग्रजी लोकांच्या वागण्याच्या काही पद्धती आहेत. त्यातल्या काही त्यानी हिंदुस्थानात आणावयाचा प्रयत्न केला आहे. त्यातली एक पद्धत म्हणजे, पुरुषाला पगार विचारू नये. व बाईला विचारू नये वय. ह्याची दोन कारणे संभवतात. एक तर ह्या दोन्ही खाजगी गोष्टी आहेत. आपल्याला त्याच्याशी काही कर्तव्य नाही. दुसरे कारण असे असण्याचा संभव आहे की, काही झाले तरी पुरुष पगार वाढवून व बाई वय घटवून सांगणारच. मग उगाच कशाला विचारून त्यांना खोटे बोलायला लावा !

पण नातेवाईकांकरता इंग्रजी पद्धती नसतात असा सर्वत्र समज असतो. बायका मुलाना कसले thanks द्यावयाचे ! बायकोची कशाला लोकांना ओळख करून द्यावयाची ! बरोबर बाई आहे ती बायको असणारच, हे लोक समजतीलच. त्याचप्रमाणे पगार न विचारण्याची पद्धत काय भावाकरता असते, अशा विचाराने श्यामच्या बहिणीने सवाल केला होता.

आता अशा प्रश्नाला काय उत्तर द्यावे असा श्यामला पेच पडला. खरा खरा पगार सागावा तर बहिणीचा त्यावर विश्वास बसणे शक्य नव्हते. बरं खोटा खोटा कमी करून सांगावा तर ती म्हणणार, बस का ? परदेशाला जाऊन एवढाच का पगार ? बाकी लोकांना किती तरी पगार मिळतो. तुला एवढा कमी कसा ? हे आणखी वर !

ह्या वेळी मात्र श्यामने खरा पगार सागावयाचे ठरवले होते. त्याने आपला पाच आकडी पगार सागताच बहीण चूप बसली होती; पण कोठल्या देशाला जाणार, किती वर्षांकरता जाणार, तेथे महागाई किती आहे, राधाला लगेच नेणार का येथेच ठेवणार वगैरे प्रश्न विचारता विचारता श्याम थोडा गैरसावध आहे हे बघून त्याच्या बहिणीने त्याला परत एकदा पगाराचे विचारले. श्यामने प्रथम खरा पगार सागितला असल्याकारणाने तो बावचळला नाही. त्याने परत प्रथम सांगितला होता तोच आकडा सागितला परत बहीण चूप बसली. एक तर तिचा श्यामला खरंच इतका पाच आकडी पगार मिळणार आहे, ह्यावर विश्वास बसला असावा वा श्याम आता बेरड झाला आहे, ह्याची तिला खात्री पटली असावी.

मग असेच श्यामच्या व राधाच्या नातेवाईक मंडळीकडे जेवायला व चहाला जायला सुरुवात झाली. कोणी मित्र-मंडळी घरी येऊ लागली. काहीजण श्यामने हे सारे जमवले कसे ह्याबद्दल शंका दाखवून कौतुक करू लागली. काहीजण नुसत्या पगाराच्या आकड्यावर भुलण्यात अर्थ नाही, तेथे राहणीमान कसे आहे, महागाई किती आहे त्याची चौकशी जाण्याआधी करायला पाहिजे होती, नाहीपेक्षा लंकेत सोन्याच्या विटा या म्हणीप्रमाणे स्थिती व्हावयाची वगैरे सांगून श्यामच्या आनंदावर विरजण घालू लागली.

काहीजण ग्रॅच्युइटी मिळणार की नाही ह्याची श्यामने चौकशी करावयास पाहिजे होती, म्हणू लागले. त्यांच्या मावसभावांना श्यामएवढाच पगार व वर २५% ग्रॅच्युइटी मिळणार होती व श्यामला तशी मिळणार नसल्यास त्याने अजून जाण्याचे रद्द करावे असा हट्ट ती धरून बसू लागली. काहीजण म्हणाले की, पगार कितीही मिळो, वर अगदी १०० टक्के ग्रॅच्युइटी मिळो; ह्या देशातून हिंदी लोकांना मानाने वागवत नाहीत व हलकी कामे देतात, म्हणून आपण काही झाले तरी श्यामसारखे असल्या देशाना जाणार नाही, म्हणून जाहीरही करून टाकू लागली.

काहीजण मानाने वागवण्याला व हलक्या कामाना भीक न घालता आम्हालाही तेथे तुमच्यासारखी नोकरी पहा म्हणून विनवू लागली. ' नाही तरी येथे हिंदुस्थानात हिंदी लोकांना मानाने कुठे वागवताहेत व कुठली भारी प्रतीची कामे देत आहेत ?' असे त्यांचे म्हणणे.

काही मित्राना श्यामच्या परदेशी - जाण्याचा खूप आनंद झाला होता. खरं म्हणजे त्यांच्यात व श्याममध्ये कोणतेही स्वभाव-साम्य नव्हते; पण कोणत्या कारणाकरता कोणास ठाऊक, त्यांची व श्यामची खूप मैत्री होती. त्यानी श्यामचे मनापासून कौतुक केले व राधाला काही मदत लागली तर संकोच करू नका म्हणून सागितले.

काही लुच्चे लोक होते. त्यानी श्यामच्या गरहजेरीत राधाच्या गोडपणाचा फायदा कसा घेता येईल ते चाचपून पहाण्यास सुरुवात केली. त्यांनीही श्यामला तुम्ही काही काळजी करू नका, राधाकडे आम्ही लक्ष ठेवू, म्हणून सागितले; पण त्यामुळे श्यामची काळजी कमी होण्याऐवजी वाढलीच !

¤

अशी बाकी तयारी होत असतानाच पुस्तकात काय प्रकरणे यावीत व प्रथम पुस्तकाचे नाव काय ठेवावे, ह्याचा श्याम विचार करू लागला.

आज-काल प्रवासवर्णनात्मक विनोदी पुस्तकाला वा लेखमालेला ते लिहिण्यापेक्षा त्याला योग्य नाव देण्यात जास्त कल्पकता लागते, हे श्यामने पाहून ठेवले होते. पूर्वी कसे ' माझा नेपाळचा प्रवास ' वा ' माझी विलायतची सफर ' म्हटले की लख्ख प्रकाश पडे की कुणा लेखकाने नेपाळचा वा विलायतचा प्रवास वा सफर केली आहे म्हणून. आता तसं काहीं नसतं. ' अपूर्वाई ' म्हणजे पश्चिमेकडे केल्या गेलेल्या प्रवासाचे वर्णन आहे, हे प्रवास संपेपर्यंत श्यामच्या लक्षात आले नव्हते.

हल्ली हे प्रवास-वर्णनाच्या पुस्तकाबाबत वा लेखाबाबत आहे असे नव्हे तर, खानावळी, चपलांची दुकाने, पानांची दुकाने इतकेच, काय, साध्या उसाच्या रसाच्या दुकानांच्या बाबतही नावाला महत्त्व प्राप्त झाले आहे. ज्याचा विश्वास बसत नसेल त्यानी पुण्याला एक चक्कर टाकावी व फक्त या दुकानांच्या नावाच्या पाट्या वाचाव्यात !

कोणी एक भिडे नावाचे गृहस्थ श्री. म. माटोंकडे जाऊन, ' मी पुस्तकांचे दुकान काढतो आहे त्याला नाव काय देऊ ? शकुंतला की गार्गी ?' असे विचारते झाले.

' तुमचे नाव काय ? '

' भिडे, अनंत गोपाळ ! अर्थात अनंत गोपाळ उत्तरले.

' दुकान कसले आहे ? ' --परत शांतपणे माटे.

' पुस्तकाचे, ' परत अनंत गोपाळ.

' मग भिडेसाहेब, असं करा, दुकानाला नाव ' भिडे ह्यांचे पुस्तकाचे दुकान ' असे बाळबोध नाव द्या, ' माटे म्हणाले, ' म्हणजे काय होईल की, जाणाऱ्या-येणाऱ्याला एका झटक्यात दुकान कोणाचे व कसले आहे ते कळेल '. ह्या अनंत गोपाळ भिड्यांनी माट्यांचा सल्ला मानला की नाही, माहीत नाही. पण असा माटे-सल्ला आता प्रवास-वर्णनाचे लेखकांना देण्याची वेळ आली आहे असे आपले श्यामचे मत होते.

पण असे मत असणे वेगळे व ते प्रत्यक्ष अंमलात आणणे वेगळे, हे श्यामच्या लक्षात आले. तो योग्य नावाचा जो जो जास्त विचार करू लागला तो तो हे नाव-प्रकरण औरंगाबादच्या विश्वविद्यालयाच्या का महाविद्यालयाच्या नाव-प्रकरणाएवढे अवघड आहे असे त्याला कळून चुकले. म्हणून तो एक दिवस राधाला म्हणाला, ' राधा, मला वाटते माझ्या पुस्तकाला ' माझा मस्कतचा प्रवास व तेथील वास्तव्य ' असे नाव द्यावे '.

' शीऽऽऽ ! ' राधा अंगावर झुरळ पडल्यागत किंचाळत म्हणाली, ' असं नाव देण्याची का पद्धत आहे हल्लीची ? मी सांगते तुम्हाला योग्य नाव. प्रथम हे सागा ओमान वा मस्कत कशाविषयी प्रसिद्ध आहे ?'

' चागला पगार व वर फुकट गोष्टी देण्याविषयी. ' श्याम भोळेपणाने म्हणाला, श्यामच तो !

' चू चू तसं नव्हे हो, ' राधा राग गिळत म्हणाली, ' ओमान हा देश वा मस्कत हे गाव कशाविषयी प्रसिद्ध आहे ?'

' कशाविषयी म्हणजे ?' --परत श्यामच तो.

' अहो, असं काय करता ? जसा ब्रह्मदेश म्हणजे पॅगोडांचा देश वा जपान म्हणजे गैशा बायकांचा देश तसा '.

' काय कल्पना नाही बुवा. त्या अमेरिकन सेंटरमधल्या पार्शी बाईने काही सागितले नाही. पण पूर्वी मस्कतची डाळिंबं प्रसिद्ध होती म्हणे. मस्कती डाळिंब म्हणून आता काय ' मस्कती डाळिंबांच्या देशात ' म्हणून नाव घालायचे ? ' श्यामने विचारले.

' मग तो एखाद्या फॉरिन सर्व्हिसमधल्या अधिकाऱ्याच्या बायकोचा लेख वाटेल '. राधा अधिकारवाणीने म्हणाली, ' एक लेखिका अशीच नवऱ्याची नेमणूक जेथे होते त्या त्या देशावर लेख ठोकते. बरं, नवरा आय.एफ.एस. असल्यामुळे संपादकांना नाहीही म्हणता येत नसावे.' परदेशाला जाणार होता श्याम पण परदेश-वर्णनावरच्या वाङ्मयाचा अभ्यास पक्का होत होता राधाचा !

' बरं ती डाळिंबे राहू देत '. राधाच पुढे म्हणाली, ' आता तुम्ही कोणत्या दिशेला जाता आहात ?' राधाचे मनात 'अपूर्वाई'चा ' पूर्वरंग ' आहे हे श्यामने झटक्यातच ओळखले.

' मला वाटते नैर्ऋत्येला किंवा वायव्येला.'

' म्हणजे काय ? असे दोन दिशांना एकाच वेळी कसे जाल ? '

' दोन दिशाना नाही. जाणार आहे एकाच दिशेला. पण त्या दिशेला काय म्हणतात मला माहीत नाही. उत्तर आणि पश्चिम दिशेमधली दिशा वायव्य की नैर्ऋत्य ? त्यामानाने इंग्रजी पद्धत चागली. North East, North West ! म्हणजे लख्ख प्रकाश पडतो '.

' पडला प्रकाश ! ' राधाच्या सहनशक्तीचा दोर अगदी गरवारे नायलॉनचा असला तरी आता तुटायला आला होता. ' आता लेखकालाच आपण कोणत्या दिशेला जात आहोत हे माहीत नाही तो वाचकांना काय बरोबर नेणार ? तुम्ही वायव्येला नैर्ऋत्य म्हणणार व लोकाना वाटेल की, तुम्ही ओमानऐवजी तिबेटला गेला आहात म्हणून व त्यांना अचबा वाटेल की, तिबेटला इतके उकडायला कधीपासून लागले ?'

' मग काय नाव ठेवावे ?'

' मला वाटते, आता फार रात्र झाली आहे. सगळी रात्र वाया गेली, पण नाव काही ठेवून झालं नाही '.

'आणि आता रात्री अशा वाया घालवून पण

चालवयाचे नाही', श्याम म्हणाला व त्याने दिवा मालवला.
¤

नाव ठेवण्याचा समारंभ काही 'अपरिहार्य' कारणामुळे पुढे ढकलला गेला. महाराष्ट्रातले कोणतेही पुढे ढकलले जाणारे कार्यक्रम ह्याच कारणाकरता, म्हणजे कोणत्या तरी 'अपरिहार्य' कारणाकरताच पुढे ढकलले जातात. श्याम मनाशी म्हणाला, नाव काय नंतरही ठेवता येईल. त्याची घाई कसली ? प्रथम वाचक नावे ठेवतील व त्याना प्रवासवर्णन आवडले तर टीकाकाराची फौज आहेच की नावे ठेवायला! आता आपण आपल्या पुस्तकात बायका करंज्यात सारण भरतात तसे कोणते सारण भरावयाचे त्याच्याच मागे लागू या!

बायका करंज्यात कधी पुरण भरतात, कधी खोबऱ्याचा कीस व साखर भरतात व साखर महाग झाल्यास काकासाहेबासारख्या पुढाऱ्याच्या सल्ल्याप्रमाणे तिखटा-मिठाच्या करंज्या करतात, त्याप्रमाणे आपल्या प्रवासवर्णनाच्या पुस्तकरूपी करंजीत काय काय सारण भरता येईल ह्याचा राधा व श्याम विचार करू लागले व त्या दृष्टीने पुस्तकाचे व जुन्या मासिकाचे वाचन करू लागले.

श्याम व राधा महाराष्ट्राच्या बाहेर बरीच वर्षे राहिली असल्याकारणाने महाराष्ट्राच्या सास्कृतिक जीवनाशी त्यांचा फारसा संबंध राहिला नव्हता. साहित्य, त्यातल्या नव्या लाटा, जुने तलाव, धबधबे, ओढे ह्याची त्याना काही म्हणजे काही कल्पना नव्हती. पूर्वी कुणी ओमानला जाऊन आला आहे का व त्याने वा तिने त्यावर काही पुस्तक वा लेख लिहिला आहे का, ह्याचीही त्यांना कल्पना नव्हती. मराठी नाही, निदान इग्रजी माणसाने तरी ओमानवर काही लिहिले आहे की नाही, हे माहीत असणे फार आवश्यक होते. नाही तर कोणी भक्कम टीकाकार श्यामच्या पुस्तकाचे फलाण्या इंग्रज लेखकाच्या पुस्तकाशी साम्य आहे व श्यामने ओमानला न जाता त्या पुस्तकावरच आपले पुस्तक बेतले आहे, असे म्हणावयाचा! म्हणजे आली का पंचाईत ? पण सानेगुरुजीच्या कवितेप्रमाणे, 'आता मागे हटणे नाही, तहनाम्याच्या बाता नाही' असे म्हणून श्यामने आपला अभ्यास व वाचन चालू ठेवले. तो परदेशाला जाणार असल्यामुळे आता त्याला कचेरीत कामही नव्हते. तेव्हा कचेरीतही त्याला वाचायला भरपूर वेळ मिळावयाचा.

श्यामच्या वाचनात जशी काही वाचनीय पुस्तके आली त्याचप्रमाणे मासिकातले काही लेख पण आले. त्यातल्या एका महिलेच्या लेखाने त्याचे मन आकर्षित करून घेतले. त्या लेखिकेचा नवरा कायरो येथे भारतीय वकिलातीत वा कोणा मोठ्या कंपनीत वा युनायटेड नेशन्सच्या कोणा कचेरीत मोठ्या हुद्द्यावर होता. आपण ज्याला कैरीतला 'कै' व नारोपंतमधला 'रो' असा 'कैरो' उच्चार करतो ते 'कैरो व हे 'कायारो' एकच. हे स्पष्ट करण्याचे कारण असे की, ज्या वेळी त्या पार्शी बाईने ह्या जगाच्या माहितीबद्दलचा नकाशा दाखवणारा कोष श्यामला दाखवला त्या वेळी त्याला नकाशात पॅरिसऐवजी पारी, रोमच्याऐवजी रोमा व मास्कोच्या जागी मास्कवा असे छापलेले दिसले. तो मनाशी मराठीत म्हणाला, हे देशही आपल्यासारखे ब्रिटिशाचे गुलाम होते की काय ? पुण्याचे लोकानी 'पुना'चे पुणे केल्यावर त्या लोकांनी पॅरिसचे'पारी'व 'रोम'चे रोमा करून टाकले ? आणि एवढी नावे बदलून तेथे दंगेधोपे, रस्ता रोको आदोलने, उपास-तापास काही कसे झाले नाही ? आता हे सगळे इंग्रजीत पार्शी बाईला कसे विचारावे? म्हणून त्याने येथे पारी गाव आहे; पण मला पॅरिस पाहिजे ते कुठे आहे, असे विचारले पॅरिसच्या 'स' वर जोर देत. ती पार्शी बाई अशा प्रश्नाना तोड देण्यास तरबेज झाली होती. तिने पारी व पॅरिस व रोम व रोमा एकच कसे आहेत ते श्यामला समजावून सागितले.

तर आपण ज्याला कैरो म्हणतो व बाकी जग कायरो म्हणते तेथे त्या लेखिकेचा नवरा मोठ्या हुद्यावर होता. साहेब आधी कायरोला गेले होते व बाईसाहेब एकट्या नंतर येणार होत्या व त्या प्रवासाचे बाईसाहेबांनी वर्णन केले होते; पण आपण ते त्याच्या शब्दातच वाचू या.

'जसे जसे कैरो विमानतळ जवळ येऊ लागले तसे तसे ह्यांना केलेली केबल वा टेलेक्स मिळाला असेल ना ? मिळाला असल्यास ह्याना कचेरीच्या कामापुढे विमानतळावर यावयास वेळ मिळेल ना व ह्याना वेळ मिळाला तरी त्याना आपण कोणत्या विमान-सेवेने येणार आहोत व त्याची पोहोचण्याची वेळ लक्षात राहील ना ? असे वेगळे वेगळे विचार येऊन मन अगदी द्विधा झाले.

'विमानतळावर उतरलो त्यावेळी रात्रीचे बारा म्हणजे आपल्याकडील रात्रीचे २॥ वाजले होते. साहेबाची पोझिशन व्ही. आय. पी.वर्गातली असल्यामुळे सामानाची तपासणी झाली नाही पण काळजी वाटायची ती वाटतेच नाही का ? मग आम्ही सगळे भल्या मोठ्या दालनात आलो. डोळे सारखे साहेबाना धुडाळत होते. मजा अशी की, कितीही गर्दी असली तरी साहेब अगदी चटकन ओळखू येतात. पण कितीही दूरवर पाहिले तरी साहेबाच्या डोक्याची 'चमक' दिसेना. आता काय करावे बाई ? असा प्रश्न पडला. घशाला कोरड पडली. आधीच रात्रीचे १२॥ आपल्याकडील ३ वाजलेले; त्यातून परका प्रदेश, त्यातून अरब लोकाचा प्रदेश ! देवा नारायणा सुखरूप पोहोचले तर १। डॉलरचा सत्यनारायण करीन असाही मनाशी संकल्प केला!

'पण तसा संकल्प करत तेथे किती वेळ उभे रहाणार ? मग बाहेर आले. मोठ्या मोठ्या आयात केलेल्या गाड्याचा हा मोठा ढेरच्या ढेर बाहेर उभा होता. माणसे आपआपली गाडी आली की इतराची पर्वा न करता त्या त्या गाडीत बसून वा टॅक्सीला बोलावून त्यात बसून निघून जात होती.

'आता १ म्हणजे आपल्याकडील रात्रीचे ३॥ वाजले होते. साहेब आलेच नाहीत. काय करावे असा प्रश्न पडला. टेलिफोनची अद्यावत केन्द्रे होती; पण तो करण्याकरता त्या देशाची नाणी हाती नव्हती. सर्व जगभर विमानतळावर टेलिफोन करण्याकरता एकाच तऱ्हेची नाणी का ठेवत नाहीत ? असा विचार मनाशी आला व आपल्या प्रवासवर्णनात हा मुद्दा नक्की माडावयाचा म्हणजे वाचकांकडून वाहवा मिळेल असे मनी आले.

'मग मन एकदम भानावर आले की, लेख लिहून वाहवा मिळवायला आपण प्रथम सुखरूप घरी तर पोहोचले पाहिजे ना ? ह्या कल्पनेने अंग शहारले.

'तेवढ्यात एका मध्यम वयाच्या अरब माणसाने माझ्याकडे पाहिले. त्याने पहाताच माझ्या छातीत धस्स झाले. तसा तो चेहऱ्यावरून सज्जन वाटला; पण त्यामुळे छातीत धस्स व्हायचे रहाते का ? बहुधा त्याने माझ्या भारतीय रूपावरून व रंगीत साडीवरून मी 'इडिया'ची आहे हे ओळखले असावे. त्याचबरोबर मी एकटी आहे ह्याचाही त्याने कयास बाधला असावा.

‘तो जवळ येऊन बोबडया भाषेत ‘इंदिया?’ विचारता झाला. मी यस्‌-कम्‌-हो असा काही उच्चार करताच तो पुढे म्हणाला, ‘आय हॅव माय कार. आय विईल ड्रॉप यू व्हेअर-अेव्हर यू वॉन्त’, मी त्याने दाखवलेल्या दिशेकडे पाहिले. आपल्याकडे शाळेची बस कशी असते तशी लांबच्या लांब पोलादी रंगाची बुईक उभी होती. मनात आले. पळवले गेले तरी हरकत नाही, निदान चांगल्या सज्जन माणसाने भल्या मोठ्या गाडीतून पळवल्याचे तरी सुख मिळेल!

‘मग मी त्याच्या गाडीत बसले. त्याने पत्ता विचारल्यावर ह्याचे सपूर्ण नाव, हुद्दा व पत्ता सांगितला. त्याने नावाकडे व हुद्द्याकडे लक्ष दिले नाही. फक्त पत्ता नीट एकला व गाडी भन्नाट सोडली. रस्ता मोठा चकचकीत व दोन्ही बाजूना उच, लखलखीत दिव्याचे खांब असलेला. रस्त्यावर गाडी जमिनीवरून जाते आह की, धर्मराजासारखी चार बोटे उंचावरून जात आह कळेना. त्याही मन.-स्थितीत आपल्याकडल रस्ते किती वाईट व दिव किती मिणमिणते असतात, असे आले. कधी सुधारणार आपला देश, अशीही मनास चिंता वाटू लागली.

‘आता तो अरब आपली माहिती काढेल व मनाशी पळवण्याचे बेत रचू लागेल, असे वाटले. पण तो एका शब्दाने बोलला नाही व जरी एका शब्दान बोलला असता तरी त्यानं गाडोत लावलल्या स्टरियो–इंग्रजी संगीता-पुढे तो एक शब्द ऐकू येणंही शक्य नव्हते. त्याला कायरोची चांगली माहिती होती असे दिसते. त्याने योग्य त्या रस्त्यावर व योग्य क्रमांक असलेल्या दुमजली घरासमोर धस्स-कन्‌ गाडी थांबवला. रेडिओपण थांबवला व परत बोबडया भाषत ‘ हियर यू आर मॅडम ईज युअर हाउस’, म्हणाला. एकदा वाटले साहेब नाही आहेत तावर त्या अरब माण-साशी शेकहॅन्ड करावा, पण आपल्या संस्कृ-ताचं बंधन अस की, तोंडातून जमतेम ‘थॅन्क्यू व्हेरी मच’ शब्दही फुटनात. एकदा वाटल हात का, घरात नेऊन साहेबांचा व त्या सज्जन माणसाची ओळख करून द्यावी. पण साहेबाचा काही भरवसा नव्हता. उगाच बकाकरया डोक्यात राख घालून घ्यावयाचे!

‘त्या माणसाला हिंदी बायकाना पड-णाऱ्या प्रश्नाची व शेकहॅन्ड करताना होणाऱ्या मानसिक तणावाची जाणीव होती असे वाटते. त्याने ‘गुद्‌ नाइत्‌’ म्हणत परत धस्सकन गाडी व रेडिओ सुरू केला व कोणीही हा हा न म्हणता दिसेनासा झाला.

‘मी दारावरची बेल वाजवली. साहे-बानीच दार उघडले. दार उघडताच आलेल्या भपकाऱ्याने व घरात चाललेल्या गोंधळा-वरून घरात रमी वा ब्रिज चालला असल्याचे स्पष्ट दिसत होते. मला बघून साहेबानी हातातल्या घड्याळाकडे पाहिले व आश्चर्य दाखवत म्हणाले, ‘अग, एअर–इंडियाने आलीस ना?’ मग इतकी वेळेवर कशी? मी आताच फोन करणार होतो, विमान किती उशीरा आहे हे विचारण्याकरता.’

‘आपल्या राष्ट्राच्या एकुलत्या एक आतरराष्ट्रीय विमानसेवेचा अपमान करा-यला लोकांना काही वाटत कसे नाही? मी तो अवमान व साहब विमानतळावर आले नाहीत ह्याचा राग एकदमच गिळला.’

बाईसाहेबाचे वर्णन सपले होते. त्या लेखावरून श्यामने काही गोष्टींची मनाशी नोद केली. प्रवास-वर्णनात अनिश्चितता हा रस निर्माण करता आला पाहिजे. म्हणजे विमान उशीरा सुटणे वा विमानतळावर घ्यावयास कोणी न येणे, वेळेवर टॅक्सी न मिळणे, खाजगी गाडी असेल तर ती नेमक्या वेळी नादुरुस्त होणे वगैरे वगैरे. दुसरे, आपण ज्या गाडीला ‘ब्यूक’असे म्हणतो तिला प्रवास-वर्णनात ‘बुईक’ म्हणतात. तिसरे, हिंदी लोक कितीही मोठ्या हुद्द्यावर असले तरी त्याना आपल्या देशाच्या विमानसेवेविषयी आदर नसतो. चवथे, कुठही गेले तरी साधारण सावळी, उंचीला कमी व भडक रंगाचे पातळ नेसलेली बाई हिंदीच आहे, असे समजावे. पाचवे व अगदी महत्त्वाचे. अरब झाले तरी ती माणसेच आहेत. कोणा बाईला पळवावे वा फूस लावावी हे त्यानाही चांगले कळते. पूर्वी साहेबाच्या राज्यात कोठेही काठीला सोने लावून फिरावे, भय नव्हते. तसेच मराठी बाइने जगाच्या पाठीवर कोठेही जावे, तिला कोणत्याही तऱ्हेचे भय म्हणून नाही!

अशाच दुसऱ्या एका लेखिकेने लिहिलेला प्रवासवर्णनात्मक लेख श्यामच्या वाचनात आला. त्या बाईंचे मिस्टर इंडियन एअरलाइन्स मध्ये कोठल्या तरी हुद्द्यावर होते. कोणत्याही हुद्द्यावर असले तरी त्या लोकाना इकडे काबूल, वा कुवेटपर्यंत व तिबेट, हॉंगकॉंग वा सिंगापूरपर्यंत चकटफू जावयास मिळते. आता हॉंगकॉंगला जाणार आहोतच तर त्यावर एक लेख ठोकावयास पाहिजे, ह्या वृत्तीने त्या बाईंनी लेख ठोकला होता.

ती सर्व मंडळी एका फ्लाइटने गेली व दुसऱ्या फ्लाइटने परत आली. म्हणजे मोजून ते लोक हॉंगकॉंगला ३॥ दिवस होते. तसे करणे आवश्यक होते. कारण कॉर्पोरेशन प्रवास फुकट करू देणार होती; पण तेथला राहण्याचा व जेवणाचा खर्च त्यांना स्वत ला करणे भाग होते. जास्त दिवस राहिले तर त्याचा सगळ्या वर्षाचा पगार संपुष्टात आला असता! त्या औट दिवसाच्या प्रवास-वर्णनात बाईने काय लिहावे? काही हॉंग-कॉंग शहराचे वर्णन? नाव नको. काही चिनी लोकांबद्दल? अक्षर काढू नका. त्या बाईने सर्व साडेतीन दिवस हॉंगकॉंगला महागाई कशी आहे व जेवणा-खाणाचे कसे हाल झाले व कधी एकदा घरी जाऊन भात-पिठले खाईन असे झाले, ह्याचेच चऱ्हाट लावले होते.

श्यामला हे खाण्याच्या हालाचे कौतुक कर-ण्याचे कळत नसे. आयुष्यात परदेशाला जायला मिळते आहे तर तेथे जाणे व वेगळे रहाणे आनंदाने उपभोगायचे, तिथल्या प्रसिद्ध गोष्टी व इमारती पहावयाच्या, तेथली म्यूझियम्स पहावयाची, की आपल्या कांदा न खाण्याबद्दल व उपासा-तापासाबद्दल कौतुक करत रहाव-याचे? हिंदू राजे व त्यांचे सैन्य मुसलमानाशी झालेल्या युद्धात कायम हरत गेले ह्याचे कारण हिंदु लोकांचे खाण्या–पिण्याचे कौतुक असेल काय? श्यामच्या मनात सहज प्रश्न चमकून गेला. साडेतीन दिवसात केले काय, तर भडक रंगाच्या साड्याची व विजेच्या उपकरणांची खरेदी व खाण्याचे हाल कसे झाले ह्याचे वर्णन! आता खर सांगायचं म्हणजे खाण्याचे हाल काय फक्त परदेशात होतात? ते तर अगदी आपल्या देशात व अगदी आपल्या घरातसुद्धा होतात म्हणून काय आपण घरातले दिवस आनदाने जगत नाही का? खाण्याचे हाल होतात म्हणून काय आपण घर सोडून जातो काय?

असे दोन-चार लेख वाचून श्यामने एकच धडा घेतला, तो म्हणजे ज्याला प्रवास–वर्णन लिहावयाचे आहे त्याने दुसऱ्याचे प्रवासवर्णन वाचू नये. जे काही अनुभव आपल्याला येतील हे लिहावे व ते लिहिणे जेवढे जमेल, तेव्हढे विनोदी करावयाचा प्रयत्न करावा. ◻

**पूर्वार्ध समाप्त : उत्तरार्ध पुढील अंकी**

## मुंबई वार्ता : पृष्ठ ३ वरून

मुंबई वार्ता : पृष्ठ ३ वरून

द्यायची, हे मिडियाचा वापर करणाऱ्यांनीच ठरवलं पाहिजे. दृक्-श्राव्य माध्यमं तर प्रेक्षक-श्रोत्यापर्यंत अधिकच जाऊन भिडतात. डॉ. शर्मांनी यामागचं शास्त्रीय सत्य सांगितलं-विज्युअल कॉर्टेक्स मोठा असतो, त्यामुळे त्याचं ग्रहणही अधिक असतं.

कॅलिफोर्नियात केलेल्या एका प्रयोगाचीही त्यानी माहिती दिली. आत्महत्येसंबंधीच्या बातम्याना भरपूर, अगदी कमी आणि सर्वसाधारण प्रसिद्धी देण्यात आली, तेव्हा समाजातल्या आत्महत्यांचं आणि मानसिक असंतुलनाचं एकूण प्रमाणही त्याच क्रमानं वदलत राहिलं. याखेरीज समाजाच्या लोकप्रिय गैरसमजातूनच कशा मानसिक गुतागुती होतात आणि आम्हाला कसे पेशटस् मिळतात याचंही डॉ. वाटव्यानी खुसखुशीत वर्णन केलं.

मनोविकृतीचिकित्सा आणि मानसोपचार हे शास्त्र आहे आणि मानसोपचारतज्ञ हे डॉक्टर्स आहेत. मनोविकृतीग्रस्त हेही काही आजार असणारे पेशंटस् आहेत; पण हिंदी चित्रपटानी मात्र हा सारा एक विनोदाचा विषय बनवला आहे. त्याच्या लेखी वेडयांचं इस्पितळ हा दोन घटका करमणुकीचा विषय असतो, तर वेडयाचा डॉक्टर हा तशाच विक्षिप्तपणाचा नमुना असतो. डॉ. नाडकर्णींनी विचारलं - मनोविकार आणि समाज याच्यात चित्रपट अशी दरी का निर्माण करतात? सायकिॲट्रीच्या शास्त्राबद्दल असे गैरसमज का पसरवले जातात? या संदर्भात बोलताना डॉ. नाडकर्णीनी आणखी एक चांगला मुद्दा उपस्थित केला. ज्या चित्रपटात वेडाची खिल्ली उडवलेली नसते आणि त्याचा गांभीर्यानं विचार केलेला असतो, ते तर भलतेच गैरसमज पसरवणारे असतात. 'खिलौना', 'खामोशी', 'बसेरा' यांसारखे चित्रपट सांगतात की, माणसाला वेड लागतं ते प्रेमाच्या अभावामुळे आणि भरपूर प्रेम देणं हाच त्याच्यावरचा उपचार. तर 'गहराई' सारख्या चित्रपटातून वेड आणि भुताटकी याचा सबंध जोडला आहे. या अतिशय ढोबळ आणि ढळढळीत चुका आहेत आणि तेवढ्याच अपायकारकही आहेत!

या संदर्भात डॉ. शास्त्रीनी एक बोलका अनुभव सांगितला. चित्रपटनिर्माते बी. आर. चोप्रा एकदा त्याना म्हणाले होते की, चित्रपटासंबंधी आधी चर्चा करताना ज्या काही चागल्या गोष्टी ठरवल्या जातात, त्याच्या दहा टक्केसुद्धा पडद्यावर येत नाहीत. म्हणजे चित्रपट अप-टू-द मार्क नसतात, हे निर्मात्यानाही मान्य आहे. अमेरिकन दूरचित्रवाणीनं चित्रपटरूपानं सादर केलेली 'रूटस्' कादंबरी पाहायला तिथले विखुरलेले कुटुंबीय कित्येक वर्षांनी घरा-घरातून एकत्र जमले आणि याचा त्यांच्यातल्या परस्परसंबंधावर फार चागला परिणाम झाला, हे आता आकडेवारीनं सिद्ध केलं आहे मग आपल्याकडे 'शोले' पाहून दरोडेखोरीची प्रेरणा मिळवणाऱ्या आणि 'एक दूजे के लिए' पाहून आत्महत्येला प्रवृत्त होणाऱ्या सिनेमाशौकीनाच्या वर्तणुकीचा अर्थ काय लावावा? तशातच एका प्रश्नकर्त्यानं तनुजाबाईंना प्रश्न विचारला, 'तुमच्या मते चित्रपटक्षेत्राची जबाबदारी काय?' 'जबाबदारी मीन्स रिस्पॉन्सिबिलिटी ओन्ली, नो?' असं त्यांनी आधी आपल्या भाषेत स्वच्छ करून घेतल आणि मग त्या प्रश्नकर्त्यावर तुटून पडल्या - हे पहा, आधी तुम्ही तुमची जबाबदारी ओळखा, आणि मग आम्हाला आमची काय जबाबदारी ती विचारायला या! त्याचा एकूण आवेश (तोही साहेबाच्या बोलीतला) असा काय जबरदस्त होता की, प्रेक्षकानी टाळ्याचा कडकडाट केला आणि प्रश्न गप्प झाला नाही, तरी निदान प्रश्नकर्ता गप्प झाला! खरं म्हणजे मुलाखत घ्यायची होती ती मिडियावाल्याची. मिडियावाल्यानी जनतेची मुलाखत घ्यावी असा कार्यक्रम नव्हता. निदान म्हणून तरी तनुजाबाईंनी उत्तर द्यायला हवं होतं. आणि तेही स्पष्ट प्रश्नाला प्रतिप्रश्न हा टाळ्या मिळवायचा मार्ग झाला, उत्तर द्यायचा नव्हे.

विश्वास मेहेंदळ्यानीही त्याना साथ दिली. तर काय ज्याच्यासाठी कार्यक्रम करायचे, तो जनताजनार्दनच असा बेजबाबदार आणि अभिरूचिहीन! मेहेंदळ्याच्या बोलण्यात खास दूरदर्शनी खमगपणा आणि मुद्द्याला सोडून बोलण्याची हातोटी जाणवत होती! नाही तरी त्यांच्या मते बांधिलकी असते ती करमणुकीशी, मुद्द्याशी नव्हेच! आमच्याकडे तुडुंब अर्ज लोटतात, आम्हाला बातम्या वाचू द्यात म्हणून, म्हणजे पहा किती लालचावलेले असतात लोक! त्यातच काहीजण बरोबर आपले फोटोही पाठवतात. ते तर त्याहूनही भयानक! एकदा एक बाईनं आपला कसला फोटो पाठवला माहीत आहे? अहो चक्क वाडी भरलेला!

प्रेक्षकांचा जबरदस्त हशा, टाळ्या, त्यातच फिल्मिगच्या कॅमेराचा लखलखाट - यात त्याना अधिकच चेव चढला. त्यांनी मग उठून हातात धनुष्यबाण घेतल्याची पोज घेऊन दाखवली आणि टाळ्यांचा कडकडाट विरेपर्यंत 'फ्रीज' मध्ये उभंही राहून दाखवलं. (मुद्दा तर बिचारा कधीच 'फ्रीज' झाला होता!)

एखादा तोंडदेखला निष्कर्षही न काढता परिसवाद संपला. गप्पा-टप्पा आणि हास्यविनोद तर पुष्कळ झाला. करमणूकही झाली थोडी-फार. मानसिक आरोग्य म्हणतात ते हेच नसावं बहुतेक!

—ललिता बर्वे

# चित्रपटाबाहेर....

## 'एंट्री'त प्रेक्षकांना जिंका... 'एक्झिट' ने चुटपूट लावा..

रंगभूमीवर 'एंट्री' घेतात त्या अर्थाची 'एंट्री' येथे अपेक्षित नाही प्रत्येक पात्राला पडद्यावर यावेच लागते आणि त्याचे काम सपल्यावर पडद्यामागे जावे लागते प्रत्येक पात्र 'एंट्री' आणि 'एक्झिट' घेत असते.

चित्रपटात एखाद्या पात्राची 'एंट्री' केव्हा होते याची जेव्हा प्रेक्षक वाट पाहतात आणि त्या पात्राने एंट्री घेतल्यावर ज्या पद्धतीने प्रेक्षक जेव्हा निहायत खूष होतात, ती 'एंट्री' माझ्या दृष्टीने योग्य! पहिल्या पदार्पणातच प्रेक्षकांना जिंकण्याचे सामर्थ्य त्या भूमिकेत असते, असा याचा अर्थ. याच्या उलट गोष्ट 'एक्झिट'ची. चित्रपटाचे कथानक चालू असताना एखादे पात्र आपल्याला नकोसे होते आणि त्याची पडद्यावरची उपस्थिती अनावश्यक वाटू लागते. त्याने 'एक्झिट' केल्यानंतर आपण सुटकेचा नि श्वास टाकतो. अशा प्रकारचे एक्झिट त्या चित्रपटाच्या अपयशाला कारणीभूत ठरते; पण एखादे पात्र पडद्यावरून अशा प्रकारे लुप्त होते की, त्याच्या 'एक्झिट' ची आपल्याला चुटपूट लागून रहाते. त्याच्या हालचाली, त्याचे हावभाव, त्याचा अभिनय, त्याचा चेहरा हे सारे सारे मोहवून टाकणारे असते. तो कथानकाच्या ओघात योग्य वेळी निघून गेला तरी त्याची प्रतिमा मनावर ठसतेच, पुन्हा कथा परिणामकारक होते, ही गोष्ट वेगळीच.

'आनंद' हा चित्रपट एंट्री आणि एक्झिट या दोन्ही दृष्ट्या अगदी उत्तम असा ठरला. अर्थात राजेश खन्नाबद्दल मी सागतोय. फ्लॅशबॅकचे कथानक चालू होते आणि 'आनंद' ही व्यक्ती कशी आहे, ती कोणत्या अवस्थेत प्रविष्ट होणार आहे याबद्दल अन्य पात्रे बोलत

MANOOS ( Marathi Weekly ) 100 Paise · Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without preyayment of postage–No. 11 )

असतात. वातावरणनिर्मिती होत असते. कोणी तरी ' आनंद आया है ' असं म्हणतं आणि पडद्यावरची पात्रे श्वास रोखून धरतात, गोंधळतात. चित्रपटगृहात बाकीच्या प्रेक्षकांची अवस्थाही यापेक्षा वेगळी नसते. आनंद त्याच्या आनंदी आगमनाने साऱ्यांच्या मनावरील तणाव कमी करतो आणि सगळे कुंद धुके आपल्या विनोदाने आणि अवखळ हास्याने बदलून टाकतो. हा आनद संपूर्ण चित्रपटभर दिसतो आणि मग शेवटी आनंद निघून जातो. तो जातो तेव्हा ' आनंद तुम मरे नही ! ' असे त्याचा डॉक्टर (अमिताभ बच्चन) ओरडतो आणि दु:खातिरेकाने हुंदके देतो. आनद गेल्याची चुटपूट प्रेक्षकांनाही लागलेली असते. नायकाची 'एंट्री' आणि 'एक्झिट' योग्य वेळी करून दिग्दर्शकाने हा चित्रपट खिशात टाकला आहे. यात अभिनेत्याचे, कथालेखकाचे आणि दिग्दर्शकाचे श्रेय किती, ते ज्याने त्याने (म्हणजे प्रेक्षकांनी !) ठरवावे !

एखादा अभिनेता आपल्या प्रतिमेने आपली चित्रपटातली एंट्री प्रभावी करतो. त्याला कथानक आणि दिग्दर्शक यांनी फारसं सांगावं लागत नाही या अभिनेत्याचे स्वत चे काही वजन असतेच ! राजकुमारने आपल्या आरंभीच्या चित्रपटामध्ये अनेक ' एंट्रीज ' ऐटबाजपणे करून खऱ्या नायकाची छुट्टी करून टाकली आहे. ' दिल एक मंदिर '-मध्ये राजेंद्रकुमारला भेटण्यासाठी त्याच्या हॉस्पिटलमध्ये मीनाकुमारी येते त्या वेळी तिच्याबरोबर तिचा पती (राजकुमार) असतो. डॉक्टर म्हणून राजेंद्रकुमारला पाहिल्यावर मीनकुमारीची अवस्था चमत्कारिक होते. तीच गत राजेंद्रकुमारची. दोघेही एकमेकांकडे पहात असताना राजकुमार शांत आवाजात विचारतो ' हम बैठें, डॉक्टर...?' या आवाजाने राजकुमारचे अस्तित्व जाणवते, ते पुढे साऱ्या चित्रपटभर टिकून रहाते. अर्थात, या चित्रपटात एक्झिट योग्य वेळी करण्याचे श्रेय राजेंद्रकुमारने घेतले आहे आणि कथानकामुळे त्याला ते शोभलेही. त्याचा शब्द प्रेक्षकाच्या काळजाला चटका लावून गेला !

' काजल 'मध्ये राजकुमार मध्यंतराच्या आधी एक मिनिट प्रविष्ट होतो; पण ही एंट्री इतकी जबरदस्त असते की, आता खरा चित्रपट सुरू झाला, अशा सुखद भावनेने प्रेक्षक टाळया वाजवतात. मध्यंतरानंतर त्याच्या अपेक्षा पूर्ण होतात. ' हमराज ' मध्येही राजकुमारची मध्यंतरानंतरची एंट्री उत्सुकता वाढवणारी होती; पण नंतरच्या बऱ्याच चित्रपटामध्ये राजकुमारच्या एक्झिट-चीच लोक वाट पाहू लागले ! अगदी अलीकडे ' बुलंदी 'मधली मात्र त्याची एंट्री लोकांना आवडली. हे श्रेय मात्र दिग्दर्शकाचे. अभिनेत्याला स्वतःच्या ताब्यात ठेवून कथानकात त्याला योग्य वेळी धाडण्याचे काम दिग्दर्शक जितक्या सफाईने करील तितक्या सफाईने ही एंट्री प्रभावी होत असते.

' धूल का फूल ' या बी. आर. चोप्रा यांच्या चित्रात मनमोहन कृष्ण या चरित्र-अभिनेत्याने ' पाला हुआ बच्चा ' त्याच्या खऱ्या आई-बापाकडे सुपूर्त करून केलेले एक्झिट प्रत्येकाच्या डोळयात पाणी आणते ! चरित्र अभिनेत्याच्या अभिनयाच्या ताकतीचा हा विजय आहे. एन्ट्रीचा प्रभाव दिलीपकुमारने ' देवदास ', ' यहुदी ' आणि ' राम और श्याम ' मध्ये दाखविला होता. अभिताभ बच्चनची ' दीवार ' मधील एन्ट्री अशीच कडक होती. प्रेक्षकाना झटकन काबूत घेणारी थंड, पण करारी नजर, मजुराकडून पैसे घेणाऱ्या मुकादमाविषयी बोलताना अमिताभ ' कल के किसीसे पैसे नही लेगा ' असे म्हणत चहाचा कप खाली ठेवतो, तेव्हा प्रेक्षकांना त्याच्या सामर्थ्याची पूर्ण खात्री पटलेली असते. व्यक्तिमत्त्वाची, भूमिकेवरची ताकद पहिल्याच प्रवेशात उभी करणं यालाच ना यशस्वी एन्ट्री म्हणतात ! याच चित्रपटात आईच्या मांडीवर डोक ठेवून अमिताभ जेव्हा ' जिंदगीसे लढनेवाले थक गया है कों ! मुझे नींद आ रही है ' असं म्हणतो तेव्हा त्याच्या एन्ट्रीने प्रेक्षक गदगदून गेलेले असतात.

अभिनेत्रीबाबत बोलायचे झाले तर ' प्यासा ' मध्ये वहिदा रेहमानने केलेली एन्ट्री ! ' जाने क्या तूने कही ' हे गाणे म्हणत, ' लाल पत्थर 'मध्ये हेमामालिनीने सौंदर्याप्सरा म्हणून केलेली मादक एंट्री (जी नायकाला आणि प्रेक्षकाना एकदमच घायाळ करते) ' मोसम 'मध्ये शर्मिलाने संजीवकुमारला चक्रावून सोडणारी केलेली 'एंट्री' अशा काही एंट्री लक्षात राहतात ' अपनापन '-मध्ये रिना रॉयने केलेले एक्झिट बऱ्याच जणाच्या लक्षात राहिले. ही कमावण्याची गरज होती. तरीही प्रेक्षकांना चुटपुटत ठेवण्याचे सामर्थ्य त्या व्यक्तिरेखेत होते.

एंट्री अतिशय आनंदित करणारी, पण एक्झिट मात्र उबग आणणारे असा प्रकार एल. व्ही. प्रसादच्या ' एक दूजे के लिए ' या अगदी ताज्या चित्रपटात झाला आहे. रति अग्निहोत्री आणि कमल हासन ही हिंदी पडद्यावरील नवी जोडी गुलाबाच्या फुलाचा टवटवीतपणा घेऊन पडद्यावर येते तेव्हा प्रेक्षक वेगळयाच प्रकारच्या आनंदप्रवाहात ओढले जातात. मध्यतरापर्यंत हा खळाळत असतो. पण मध्यंतरानंतर दिग्दर्शक के. बालचंदर याला असा काही दु:खाचा आवेग आला की सर्वांनाच त्याने दु:खसागरात लोटून दिले ! नायक–नायिका भरपूर मार खाऊन गोव्याच्या खाडीत ( की समुद्रात ) उडी घेतात तेव्हा सुजाण प्रेक्षक दिग्दर्शकाच्या शोधात असतो. एवढया सुदर कथानकाचा विचका केल्याबद्दल दिग्दर्शकाला जगातून एक्झिट करण्यासाठी !

' एंट्री ' आणि ' एक्झिट 'च्या अशा खूपच गमती–जमती आणि उदाहरणे सागता येतील या दोन्ही जिथं जमल्या ते चित्रपट यशस्वी झाले. यापैकी एखादी जमली ते चित्रपट तगले. दोन्हीही जमल्या नाहीत. ते चित्रपट यशस्वी करणारे प्रेक्षक वेडे आणि पाडणारे मात्र सुजाण असे म्हणावे लागते !

–बिलंदर